POSTAL REGISTRATION : PLG/255/2023-2025

RNI NO:- MAHMAR/2021/81614

मराठी दैनिक

# मराठी एकीकरण बातमीपत्र

मराठी मायबोलीचा अभिमान जोपासणारे एकमेव पत्र

○संपादक : डॉ. श्री. दिपक मोरेश्वर नाईक

○उप संपादिका : .सौ. प्रीती दिपक नाईक ○कार्यकारी संपादक : श्री. विनोद दशरथ मेढे

● वर्ष -०५ ● अंक-०२ ● मुंबई, शनिवार, २ ऑगस्ट २०२५ ● पृष्ठ-८ ● मूल्य-५ रु.

MARATHI EKIKARAN BATMIPATRA

## महाराष्ट्रातील निवडणूक निष्पक्ष, तपासणीत ईव्हीएम-व्हीव्हीपॅट निर्दोष आढळले - निवडणूक आयोग




■मुंबई । प्रतिनिधी,
राज्यातील विधानसभा निवडणुकीत वापरलेले सर्व ईव्हीएम आणि व्हीव्हीपॅट तपासणीत योग्य असल्याचे आढळले. त्यामुळे निवडणूक निष्पक्ष असून निकालांबात शंकेला वाव नसल्याचा निवाळा निवडणूक आयोगाने दिला आहे. काँग्रेस नेते राहुल गांधीसह आपपल्या मतदारसंघात पराभूत झालेल्या १० उमेदवारांच्या तक्रारींनंतर आयोगाकडून हे पाऊल उचलण्यात आले. राज्याचे मुख्य निवडणूक अधिकारी एस.चोक्कलिंगम यांनी १० उमेदवारांच्या विनंतीनुसार १० मतदारसंघांमध्ये क्रॉस-चेकिंग केले. या प्रक्रियेत ८ उमेदवार किंवा त्यांच्या प्रतिनिधींनी प्रत्यक्ष उपस्थित राहून तपासणी पाहिली. तर, दोन उमेदवारांनी उपस्थित राहणे टाळले. यावेळी एकूण ४८ मतदार युनिट, ३१ नियंत्रण यंत्रे आणि ३१ व्हीव्हीपॅट यांची तपासणी झाली. त्याचप्रमाणे, निवडक मतदारसंघांमधील उमेदवारांच्या विनंतीवरून मायक्रोकंट्रोलर व मेमरी पडताळणीसाठी निदान चाचणी घेण्यात आली. राज्यातील कोपरी-पाचपाखाडी, ठाणे, खडकवासला आणि माजलगाव या काही मतदारसंघांमध्ये मायक्रोकंट्रोलर व मेमरी पडताळणीसाठी निदान चाचण्या करण्यात आल्या. तर पनवेल, अलीबाग, आर्णी, येवला, चंदगड, कोल्हापूर उत्तर आणि उर्वरित माजलगावमध्ये निदान चाचणीसह मॉक पोलही घेण्यात आला. सर्व चाचण्यांदरम्यान ईव्हीएम यंत्रे योग्य प्रकारे कार्यरत असल्याचे प्रमाणित झाले आहे. या पार्श्वभूमीवर भारतीय निवडणूक आयोगाने पुन्हा एकदा स्पष्ट केले आहे की, ईव्हीएम यंत्रांमध्ये कोणतीही छेडछाड करता येत नाही. त्यामुळे निवडणूक निकालांबाबत शंका घेण्याचे कारण नाही, असे आयोगाने स्पष्ट केले आहे.

## ‘मराठी एकीकरण बातमीपत्र’चा तिसरा वर्धापन दिन

### तीन वर्षांची यशस्वी पत्रकारितेची वाटचाल

मराठी भाषेच्या एकीकरणासाठी, हक्कांसाठी आणि सामाजिक भान जागवणाऱ्या बातम्यांसाठी समर्पित असलेल्या ‘मराठी एकीकरण बातमीपत्र’ या दैनिक वृत्तपत्राने आज आपल्या यशस्वी तीन वर्षांची वाटचाल पूर्ण केली आहे. दिनांक १ ऑगस्ट २०२२ रोजी सुरू झालेल्या या प्रवासाने अल्पावधीतच वाचकांचा विश्वास आणि प्रेम मिळवले आहे.

या विशेष प्रसंगी संपादक डॉ. दीपक मोरेश्वर नाईक यांनी सांगितले की, ‘वृत्तपत्र हे केवळ बातम्यांचे माध्यम नसून, ते समाज परिवर्तनाचे प्रभावी साधन आहे. आम्ही हे कार्य प्रामाणिकपणे पुढे नेत आहोत.’

या तीन वर्षांच्या कालखंडात ‘मराठी एकीकरण बातमीपत्र’ ने विविध सामाजिक, शैक्षणिक, सांस्कृतिक आणि राजकीय मुद्द्यांवर ठामपणे भूमिका घेत अनेक विशेष अहवाल आणि बातम्यांद्वारे लोकांच्या मनात जागा निर्माण केली आहे.

**आजच्या दिवशी विविध क्षेत्रातील मान्यवरांनी शुभेच्छा देत ‘मराठी एकीकरण बातमीपत्र’च्या पुढील वाटचालीसाठी शुभेच्छा दिल्या आहेत.**

**‘मराठी अस्मिता, मराठी आवाज’ यासाठी समर्पित असलेले हे व्यासपीठ भविष्यातही निष्ठेने कार्यरत राहो, हीच सदिच्छा!**

## पोलीस आयुक्तालयासाठी खासगी जमीन हस्तांतरणाचा मार्ग मोकळा

■मिरारोड । प्रतिनिधी,
मिरा-भाईंदर वसई-विरार पोलीस आयुक्तालय तयार करण्यासाठी एकूण आरक्षित जागेतील पहिल्या टप्यात शासकीय जमीन भूसंपादित करण्यात आली आहे. उर्वरित दुसऱ्या टप्प्यातील खासगी जमिनीच्या भूसंपादनासाठी निधीची प्रतीक्षा होती. त्यासाठी आता राज्य सरकारने २७ कोटींचा निधी मंजूर केला आहे. त्यामुळे खासगी जमीन हस्तांतरित करण्याचा मार्ग मोकळा झाला आहे. त्यानंतर आयुक्तालयाच्या कामकाजाला प्रत्यक्षात सुरुवात करता येणार आहे. सध्या भाड्याच्या इमारतीतून आयुक्तालयाचा कारभार हाकला जात आहे. ऑक्टोबर 2020 मध्ये ठाणे जिल्ह्यातील मिरा-भाईंदर आणि पालघर जिल्ह्यातील वसई विरार या परिसराला एकत्र करून मिरा भाईंदर वसई विरार पोलीस आयुक्तालयाची स्थापना करण्यात आली.गृह खात्याकडे इमारत उपलब्ध नसल्याने तात्पुरत्या स्वरूपात भाडेतत्त्वावर मिरारोड पूर्व येथील रामनगर परिसरातील महापालिकेच्या इमारतीतून आयुक्तालयाच्या कामकाजाची सुरुवात झाली. पुढील कार्यकाळासाठी पोलीस आयुक्तालयाला स्वतःच्या मालकीची जागा गरजेची असल्याने मिरारोड पूर्वेच्या मिरागाव येथील मुख्यालयासाठी आरक्षित असलेल्या ११ हजार ८१५ चौरस मीटर जागेत इमारत उभारण्याचे निश्चित करण्यात आले.मिरा- भाईंदर महापालिकेच्या ताब्यात असलेली सात हजार चौरस मीटर जागा ताब्यात घेण्यासाठी बाजार भावानुसार महापालिकेला वीस कोटी रुपये आयुक्तालयाकडून अदा करण्यात आले.मात्र उर्वरित ४५९४ चौरस मीटर जागा खासगी मालकीची असल्याने निधी उपलब्ध नसल्याने भूसंपादनाची प्रक्रिया थांबली होती. संबंधित खासगी जमीन भूसंपादित करण्यासाठी जागेचे मूल्यांकन करून पोलीस आयुक्तालयकडून गृह खात्याला अहवाल सादर करण्यात आला.अखेर शासनाकडून 27 कोटी 95 लाखांचा निधी मंजूर केल्याचा आदेश 30 जुलै रोजी जारी केला आहे. उर्वरित खसगी जागेच्या भूसंपादनाची प्रक्रिया पोलीस प्रशासनाकडून करण्यात येणार आहे.त्यामुळे मिरा-भाईंदर वसई विरार पोलीस आयुक्तालयाच्या मुख्यालय उभारण्याचा मार्ग मोकळा आता झाला आहे.




### पुढील कार्यवाही पोलीस महामंडळ करणार

पोलीस आयुक्तालय उभारण्याच्या अनुषंगाने आराखडा तयार करण्यासाठी यापूर्वीच राज्य पोलीस गृहनिर्माण आणि कल्याण महामंडळाकडून आर्किटेक्चर नेमण्यात आला आहे. आता खासगी जमिनीचे भूसंपादित झाल्यानंतर संपूर्ण जागा ताब्यात आल्याची बाब पोलीस आयुक्तालयाकडून त्यांना कळवली जाणार आहे. त्यानंतर इमारतीचा आराखडा आणि त्यासाठी येर्णाया खचार्ची माहिती महामंडळ राज्य सरकारला सादर करणार आहे.

## पालिकेच्या पाणी खात्यातील कामगार १ नोव्हेंबरला संपावर



■मुंबई । प्रतिनिधी,
सफाई कामगारांनंतर आता मुंबई महापालिकेच्या पाणी खात्यातील कामगारांनी आपल्या विविध मागण्यांसाठी आंदोलनाचे हत्यार उपसले आहे.वरळीतील अभियांत्रिकी संकुलात संतप्त कामगारांनी नुकतीच निदर्शने करत विविध मागण्या केल्या. आपल्या मागण्यांची अंमलबजावणी ३१ ऑक्टोबरपर्यंत झाली नाही तर १ नोव्हेंबर रोजी पाणी खात्यातील सर्व कामगार संपावर जातील, असा इशारा द म्युनिसिपल युनियनने दिला. सफाई आणि परिवहन खात्यातील कंत्राटीकरण विरोधात स्वच्छता कामगारांनी दिलेल्या यशस्वी लढ्यानंतर आता पाणी खात्यातील कामगारही विविध मागण्यांसाठी आक्रमक झाले आहेत. अनेकांना पदोन्नती मिळालेली नाही.त्यामुळे विविध संवगार्ची रिक्त व पदोन्नतीची पदे तातडीने भरावीत, पहिल्या, दुसऱ्या व तिसऱ्या कालबद्ध पदोन्नतीचा फायदा देणे, सेवा पुस्तिकेची दुय्यम प्रत देणे, कामगारांना घाणकाम भत्ता द्यावा, मानीव कायमत्व व गोपनीय अहवालाची प्रत देणे ,प्रतवारी कामगारांना देणे, समान कामाला समान वेतन द्यावे, कामगारांना कर्तव्यसूची देणे, अतिकालीन भत्याचे योग्य पद्धतीने अधिदान करावे, चौकीवरून कामाच्या ठिकाणी ये-जा करण्यासाठी वाहन उपलब्ध करावे तसेच चौक्यांची पुर्नबांधणी करून आवश्यक त्या सुविधा उपलब्ध करण्याचीही मागणी या कामगारांनी केली आहे.

## मुंबई लोकल तिकिटांसाठी आता व्हॉट्सअ‍ॅप!




■मुंबई । प्रतिनिधी,
मुंबईकरांना लोकल ट्रेनची तिकीटं काढणं आणखी सोपं होणार आहे. रेल्वे आता व्हॉट्सअ‍ॅपसारख्या चॅट-आधारित अ‍ॅपवरून तिकीट बुकिंगची शक्यता पडताळून पाहत आहे. अलीकडेच रेल्वे अधिकाऱ्यांनी या संदर्भात विविध संस्थांशी चर्चा केली आहे आणि सर्व तपशील निश्चित झाल्यावर निविदा प्रक्रिया पूर्ण केली जाईल. 'डिजिटल इंडिया' उपक्रमाचा हा एक भाग आहे, ज्याचा उद्देश जलद आणि कॅशलेस तिकीट सेवा प्रदान करणे आहे. सध्या, सुमारे २५% प्रवासी डिजिटल पद्धतीने तिकीट बुक करतात आणि ही संख्या दररोज वाढत आहे. रेल्वेला आशा आहे की चॅट-आधारित प्रणाली आणखी सोयीस्कर ठरेल. मेट्रो प्रवाशांमध्ये ही प्रणाली आधीच लोकप्रिय आहे, जिथे क्यूआर कोड स्कॅन केल्यावर एक चॅट इंटरफेस उघडतो. 'हाय' मेसेज पाठवल्यानंतर प्रवासी त्यांचे पर्याय निवडू शकतात, पैसे देऊ शकतात आणि डिजिटल तिकीट प्राप्त करू शकतात. मेट्रोमध्ये ६७% तिकीट बुकिंग या पद्धतीने होते. मात्र, अधिकारी सावध आहेत. लोकल ट्रेनसाठी अशीच क्यूआर-आधारित प्रणाली पूर्वी गैरवापरली गेली होती, त्यामुळे नवीन प्रणाली समान समस्या टाळण्यासाठी काळजीपूर्वक विकसित करावी लागेल. पश्चिम रेल्वेचे मुख्य जनसंपर्क अधिकारी, विनीत अभिषेक यांनी सांगितले की, वापरकर्ता-अनुकूल प्रणाली तयार करण्यासाठी ते चॅट-आधारित तिकीट बुकिंगसह अनेक पर्यायांवर विचार करत आहेत.

## कबूतरांना खाद्य घालणानांवर गुन्हे दाखल करा; हायकोर्टाचे पालिका प्रशासनाला निर्देश

### काय म्हणाले न्यायालय?

कबूतरखान्यातील कबूतरांच्या समूहामुळे नागरिकांच्या आरोग्याचा धोका निर्माण झाला आहे. असे असतानाही काही व्यक्तींनी बेकायदेशीरपणे कबूतरांना खाद्य देणे सुरू ठेवले आहे.



■मुंबई । प्रतिनिधी,
दादर येथील कबुतरखान्यात पक्ष्यांना खाद्य घालण्यासाठी मनाई असताना देखील खाद्य कसे घातले जाते असा संतप्त सवाल न्यायालयाने उपस्थित केला आहे. न्यायमूर्ती गिरीश कुलकर्णी आणि न्यायमूर्ती आरिफ डॉक्टर यांच्या खंडपीठाने नाराजी व्यक्त केली आहे. कबुतरांची पिसे, विष्ठा मानवी आरोग्याला धोकादायक असतानाही लोकांकडून न्यायालयीन आदेश धुडकावत कबुतरांना खाद्य घातलेच कसे जावू शकते? असा प्रश्न न्यायालयाने पालिका प्रशासनाला विचारला आहे. याला आळा घालण्यासाठी आणि कायद्याची जरब बसविण्यासाठी संबंधितांवर गुन्हे दाखल करा असे आ-देश देखील पालिका प्रशासनाला देण्यात आले आहेत. कबुतरांच्या विष्ठेमुळे आणि पिसांमुळे आरोग्यास गंभीर धोका निर्माण होतो, असे कारण देत पालिकेला शहरातील कबुतरखाना बंद करण्याचे निर्देश राज्य सरकारने दिले होते. मात्र पल्लवी पाटील यांनी कबुतरांना खायला घालण्यास बंदी घातल्याने त्यांचा मृत्यू होत असल्याने खाद्य घालण्यापासून रोखू नये अशी मागणी करत हायकोर्टात याचिका दाखल केली आहे.या याचिकेवर बुधवारी न्यायमूर्ती गिरीश कुलकर्णी आणि न्यायमूर्ती आ-रिफ डॉक्टर यांच्या खंडपीठासमोर सुनावणी झाली. त्यावेळी बंदी असतानाही कबुतरांना खाद्य दिले जात असल्याचे न्यायालयाच्या निदर्शनास आले. खंडपीठाने याची गंभीर दखल घेत तीव्र नाराजी व्यक्त केली. तसेच संबंधितांवर बीएनएस कायद्याअंतर्गत पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्याचे आदेश देण्यात आले आहेत. पालिकेच्या वतीने ॲड. रुपाली अधाते तर राज्य सरकारच्या वतीने ॲड. मानकुवर देशमुख यांच्याकडून बाजू मांडण्यात आली. दरम्यान न्यायालयाने दिलेले अंतरिम आदेश कायम ठेवत फौजदारी कारवाईचा अहवाल सादर करण्याचे आदेश प्रशासनाला दिले व सुनावणी ७ ऑगस्टपर्यंत तहकूब ठेवण्यात आली.

## ...म्हणजे मी दादागिरी करतो का?

### जित पवारांचा थेट देवेंद्र फडणवीसांना सवाल, नेमकं काय घडलं?



■पुणे । प्रतिनिधी,
केंद्रीय मंत्री नितीन गडकरी यांनी यंदाचा लोकमान्य टिळक राष्ट्रीय पुरस्कार प्रदान करण्यात आला. या वेळी भाषण करताना अनेक नेत्यांनी मिश्किल टोलेबाजीही केली. याबाबत सविस्तर माहिती जाणून घेऊयात. केंद्रीय मंत्री नितीन गडकरी यांनी यंदाचा लोकमान्य टिळक राष्ट्रीय पुरस्कार प्रदान करण्यात आला. पुण्यात झालेल्या या कार्यक्रमात मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, उपमुख्यमंत्री अजित पवार, उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे, माजी मुख्यमंत्री सुशीलकुमार शिंदे यांच्यासह अनेक नेते उपस्थित होते.

यावेळी सर्वच नेत्यांनी गडकरींच्या कामाचे कौतुक केले. या वेळी भाषण करताना अनेक नेत्यांनी मिश्किल टोलेबाजीही केली. याबाबत सविस्तर माहिती जाणून घेऊयात. गडकरींची एक आठवण सांगताना फडणवीस म्हणाले की, ह्यपुणे मुंबई हायवे साठी ३६०० कोटी रुपयांचा टेंडर रिलायन्सने भरलं होतं. नितीन गडकरींना ते जास्त वाटलं सतराशे अठराशे कोटीत काम होऊ शकते असं त्यांना वाटलं, म्हणून त्यांनी ठरवलं की मी हे टेंडर देणार नाही. धीरूभाई अंबानी खूप मोठे उद्योजक होते त्यांनी जेवणासाठी निमंत्रित केलं आणि त्यांनी सांगितलं की, जे तुम्ही काम करू शकणार नाही हे सरकार काम करू शकणार नाही हे काम कठीण आहे हे काम तुम्ही आम्हाला द्या. नितीनजींनी धीरूभाईंना सांगितलं, धीरूभाई हे काम अर्धा किमतीमध्ये मी करून दाखवेल आणि त्या दिवशी तुम्ही मला जेवायला बोलवा. मी तुमच्याकडे जेवायला येईल अशा प्रकारची शर्यत नितीन गडकरींनी लावली आणि तो हायवे १५०० कोटीत करून दाखवला. देशाचे पंतप्रधान नरेंद्र मोदींनी देखील नितीन गडकरींचे गुण ओळखले. पंतप्रधान मोदींच्या मंत्रिमंडळातील सर्वाधिक काम करणार व्यक्तिमत्व दुसरं कोणीच नाही केवळ गडकरी आहेत. आपण पाहिलेलं स्वप्न हे प्रत्यक्षात उतरत हे नितीनजींनि दाखवलं. जे मनात येईल ते बोलणारे देखील नितीन गडकरी आहेत त्यांनी कधीच असा विचार केला नाही की बोलल्यानंतर काय परिणाम होईल, अनेकदा राजकारणात सत्य माहित आहे पण ते बोलू नये असा पण ठरवतो दरवेळेस सत्य बोलल्याने फायदा होतो असं नाही. अनेकदा राजकारणात नुकसान देखील होतो पण असं परिस्थिती आली तर नितीनजी हमखास बोलतील तिथे नुकसान झालं तरी ते बोलत असतात .१० वषार्पूर्वी गडकरी सांगायचंचे आता इलेक्ट्रिकल व्हेईकलचा जमाना आलेला आहे. गडकरी यांनी संस्कार जोपासले आहेत, भारत मातेची सेवा करण्याकरता भारत मातेने आपल्याला उदंड आयुष्य देवो. असं फडणवीसांनी आपल्या भाषणात म्हटलं आहे.

### नितीन गडकरींचे कौतुक

नितीन गडकरींचे कौतुक करताना मुख्यमंत्री फडणवीस म्हणाले की, देशातील अतिशय प्रतिष्ठित मानला जाणारा हा पुरस्कार आज नितीन गडकरी यांना मिळत आहे. नितीन गडकरींनी अनेक प्रयोग केले अनेक प्रयोग अंगावर आले अनेकदा कर्जबाजारी झाले पण ते कधीच निराश झाले नाहीत. कितीही कठीण प्रसंग जरी आला तरी त्या प्रसंगावर मात करण्यासाठी धैययार्ने सामोरे जायचं हा त्यांच्यातील महत्त्वाचा गुण आहे.

### चंद्रकांत दादा दादागिरी करत नाहीत – फडणवीस

पुण्यातील या खास कार्यक्रमात आपल्या भाषणात बोलताना मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी, ह्यपुण्यात दोन दादा आहेत. एक दादा म्हणजे अजित दादा आणि दुसरे म्हणजे चंद्रकांत दादा. पुण्यातील दुसरे दादा जे कधीही दादागिरी करत नाहीत. काही लोक दादागिरी करत नाहीत परंतु त्यांच्या व्यक्तिमत्वातून दिसतेह्ण असं विधान केलं आहे.

### मी दादागिरी करतो का? – अजितदादांचा सवाल

यानंतर भाषण करताना अजित पवार यांनीही यावर भाष्य केले आहे. चंद्रकांतदादा दादागिरी करत नाहीत. म्हणजे मी दादागिरी करतो का? असा सवाल अजित पवारांनी फडणवीसांना केला. त्यामुळे कार्यक्रमात एकच हशा पिकला. तसेच पुढे बोलताना अजित पवारांनी चंद्रकांत दादांना लोक अजूनही पुणेकर मानत नाहीत असंही अजित पवारांनी म्हटलं.

## गोकुळाष्टमी निमित्त राज्यातील १.५० लाख गोविंदांना विमा संरक्षण



मुंबई :
गोकुळाष्टमी अर्थात दहिहंडी हा महाराष्ट्राच्या संस्कृतीचा अत्यंत महत्त्वाचा सण असून या उत्सवात राज्यातील हजारोंत युवक-युवती ₹गोविंदा₹ म्हणून थरावर थर रचत हंडी फोडण्यासाठी सहभागी होतात. मात्र गेल्या काही वर्षांत सरावादरम्यान आणि प्रत्यक्ष उत्सवाच्या दिवशी अनेक अपघात घडले असून, अनेक गोविंदांना दुखापतींचा सामना करावा लागतो. गोविंदांच्या सुरक्षिततेसाठी आणि त्यांच्या आरोग्याच्या दृष्टीने विमा संरक्षण मिळावे म्हणून परिवहन मंत्री प्रताप सरनाईक आणि युवासेना कार्याध्यक्ष पुर्वेश सरनाईक यांनी राज्याचे उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे साहेब यांच्याकडे मागणी केली होती. या मागणीला सकारात्मक प्रतिसाद देत यंदा राज्यातील सुमारे १.५० लाख गोविंदांना ₹गोविंदा समन्वय समिती (महा.)₹ या नियोजन समितीच्या माध्यमातून ₹ओरिएंटल इन्शुरन्स कंपनी₹ चे विमा संरक्षण देण्यात येणार आहे. गेल्या वर्षी १.२५ लाख गोविंदांना विमा संरक्षण देण्यात आले होते. मात्र, काही गोविंदा त्यापासून वंचित राहिले. यंदा ही त्रुटी दूर करत विमा कवचाची मर्यादा वाढवून १.५० लाख गोविंदांपर्यंत हे संरक्षण पोहोचवले जाणार आहे. यावर्षी राज्यभरातील अंदाजे १.५० लाख गोविंदांना विमा संरक्षण प्रदान करण्यात येणार आहे. या योजनेअंतर्गत ₹दि ओरिएंटल इन्शुरन्स कंपनी लिमिटेड, मुंबई₹ या कंपनीचा प्रस्ताव शासनाने मान्य केला आहे. महाराष्ट्र राज्य दहीहंडी गोविंदा असोसिएशन, अंधेरी (पूर्व), मुंबई यांच्यामार्फत आवश्यक कागदपत्रे सादर करून विमा रकमेचा खर्च शासनाकडून अदा केला जाणार आहे. क्रीडा व युवक सेवा विभाग, मुंबई यांना या संदर्भात सुसंवाद आणि आवश्यक कार्यवाही करण्याचे निर्देश देण्यात आले



संपादकीय...

संपादक

दिपक मोरेश्वर नाईक

# शिक्षणाचा विचका

जस्थानातील एका अत्यंत महत्त्वाच्या आणि सगळ्यांत गंभीर आणि धक्कादायक घटनेकडे दुर्लक्ष झाले. राजस्थानच्या झालावाड जिल्ह्यात शाळेच्या एका जीर्ण झालेल्या इमारतीचे छप्पर कोसळले आणि त्यात सात लहान मुलांचा मृत्यू झाला. ज्यांनी आपली मुले या घटनेत गमावली त्यांचा आक्रोश ही अन्य लोकांसाठी अथवा सरकारी व्यवस्थेसाठी केवळ काही क्षण अथवा तास पाहावी आणि ऐकावी लागेल अशी घटना आहे, असे मानण्याइतपत कोडगेपणा आता सगळ्यांच्याच अंगात भिनला आहे. आपल्याला सोपवलेले काम पूर्ण मन लावून करावे, निष्ठेने आणि प्रामाणिकपणे करावे असे ज्या शाळेत शिकवले जाते त्या शाळेत जर निरागस मुले मृत्यू पावत असतील तर हे शिकवणारे आणि शिकवण्यासाठी त्यांना आणणारे यांना सगळ्यांनाच आपापल्या जबाबर्दायांचा विसर पडला आहे हे स्पष्ट आहे. आम्ही धोकादायक शाळांची जी यादी मागितली होती त्यात कथित शाळेचे नावच नव्हते असे अधिकार्यांनी म्हटले. एवढे रूक्ष उत्तर त्यांना सात मुलांच्या अकाली मृत्यूतून सुटका करून देण्यासाठी पुरेसे ठरणार असल्याचे सध्यातरी दिसते. ते एकवेळ हात झटकून मोकळे होतील किंवा तसे करू शकतील, मात्र ज्या शाळेत ती मुले शिकत होती तेथील शिक्षकांना हा धोका जाणवला नाही? या शिक्षकांना स्वतःच्या जीवाचीही भीती वाटली नाही? ते शाळेत नक्की जात होते ना ज्ञानदानाच्या कामाला की त्यांचा बहुमूल्य वेळ त्यांनी अन्य महत्त्वाच्या कामांसाठी राखून ठेवला होता? घटना एका ठिकाणी घडली असली तरी पहिली नाही आणि आपली जाड कातडी जोपर्यंत संबंधितांकडून बाजूला सारली जात नाही तोवर शेवटचीही नसणार आहे. देशातील प्रत्येक राज्यात हीच अवस्था थोड्याफार फरकाने आहे. देशाला महाशक्ती करण्याच्या चर्चा होतात, त्या व्हाव्यात त्याला विरोध नाही मात्र आज आपण नेमके कुठे उभे आहोत याकडेही लक्ष देण्याची तसदी वरपासून खालपर्यंत सगळ्यांनी घ्यायला हवी. भारतातील अनेक ग्रामीण शाळांना पायाभूत सुविधांच्या आव्हानांना तोंड द्यावे लागते. इमारतींची खराब स्थिती, मूलभूत सुविधांचा अभाव याचा शैक्षणिक वातावरणावर नकारात्मक परिणाम होतो इतपत ठीक होते, मात्र आता सुरक्षिततेवरही त्याचा परिणाम होतो आहे. शहरी भागांच्या तुलनेत ग्रामीण भागातील स्थिती अधिक खराब आहे. अनेक शाळांमध्ये स्वच्छ पाणी, शौचालये, वीज आणि पुरेशा वर्गखोल्या यासारख्या मूलभूत गोष्टी नाहीत. त्यातून गळती वाढते किंवा अपार संघर्ष करत मुलींना शिक्षण घ्यावे लागते. गळकी छप्परे, पडण्याच्या बेतात आलेल्या भिंती आणि अपुरी जागा अशा अवस्थेत शिक्षण सुरू आहे. विद्यार्थ्यांना त्यातच आपल्या अभ्यासावर लक्ष केंद्रित करून स्वतःचा विकास करवून घ्यायचा असतो. जोपर्यंत येथील विद्यार्थी मोठ्या शहरांत आणि व्यापक जगात दाखल होत नाहीत तोपर्यंत चालून जाते, पण ज्यावेळी ते स्पर्धेमध्ये उतरतात त्यावेळी त्यांना आपण किती मागे आहोत याची जाणीव होते आणि यात त्यांचा दोष नसतो. अर्थात ज्या विद्याथ्यार्ला याचे म्हणजे शिक्षणाचे महत्त्व समजले असते त्यालाच याची जाणीव होते. परिस्थितीमुळे आणि त्याच्या भागात सुविधा उपलब्ध करून देण्याच्या प्रशासकीय यंत्रणेच्या उदासीनतेचा त्याला फटका सहन करावा लागतो; मात्र त्याला थांबता येत नाही. सगळ्या अडथळ्यांवर मात करत त्याला दुप्पट वेगाने आणि प्रसंगी जीवाच्या आकांताने धावावे लागते. पात्र आणि लायक शिक्षक मिळत नाहीत. शिक्षकांना आपल्या कम्फर्ट झोनमधून बाहेर पडत अन्यत्र फरफटत जाण्याची तयारी नसते. विद्यार्थी हा त्यांचा केंद्रबिंदूच नसल्याचे बहुतांश शिक्षकांच्या वर्तणुकीत आढळून येते. सगळेच शिक्षक या वर्गात मोडतात असे नाही, मात्र चांगल्या शिक्षकांची आणि व्रत म्हणून शिक्षकी पेशा स्वीकारल्याची संख्या आता खरेच किती राहिली असेल याचे संशोधन प्रत्येकाला सहज करता येऊ शकते. अशा एकूणच निराशाजनक वातावरणात शिक्षणाबद्दल आपण अनुकूलता निर्माण करत आहोत की प्रतिकूलता याचाही गांभीयार्ने विचार करण्याची वेळ आली आहे. माज्या शहरात अथवा माज्या तालुक्यात मी असले काही पाहिले नाही म्हणून सगळीकडे सर्वकाही सुरळीत सुरू आहे आणि अत्यंत उच्च दर्जाच्या वातावरणात सगळे शिकत आहेत आणि येथे तयार होणारे विद्यार्थी उद्या राष्ट्राचे भविष्य घडवणार आहेत या स्वप्नरंजनात आताच्या काळात कोणीही न राहिलेलेच बरे. झालावाडसारखी एखादी घटना घडली की राज्य प्रशासन फतवा काढून तपासणीचे आदेश जारी करते. काही राज्ये जागरूक असतात. अन्य राज्यात एखादी घटना घडली की ते तातडीने आपल्या राज्यात पुढाकार घेत स्वतःहून तपासणीची मोहीम सुरू करतात. मात्र त्यात प्रामाणिकपणाने काम करण्यापेक्षा दिखावाच अधिक असतो. बरे सरकार प्रामाणिक असेलही तरी खाली काम करणारी मंडळी पाट्या टाकणार नाहीत याची शाश्वती कोणी देऊ शकत नाही. याकरताच या आव्हानांना तोंड देण्यासाठी बहुआयामी दृष्टिकोन आवश्यक आहे, ज्यामध्ये पायाभूत सुविधांमध्ये गुंतवणूक करणे, पुरेशी शिक्षण संसाधने उपलब्ध करणे आणि पुरेशा संख्येने पात्र शिक्षक मिळणे अथवा मिळवणे महत्त्वाचे आहे. दजेर्दार शिक्षण देण्यासाठी शिक्षकांना आवश्यक कौशल्ये आणि ज्ञानाने सुसज्ज करण्यासाठी शिक्षक प्रशिक्षण कार्यक्रमांमध्ये गुंतवणूक करणे जेवढे महत्त्वाचे आहे तेवढेच व्यावहारिक कौशल्ये शिकवण्यासाठी अभ्यासक्रमाचे आधुनिकीकरण करणे गरजेचे आहे. सर्व मुलांना, त्यांची पार्श्वभूमी काहीही असो, दजेर्दार शिक्षण सुरक्षित वातावरणात उपलब्ध व्हावे. अन्यथा विकसित भारताचा संकल्प आणि त्यासंदर्भात केलेल्या घोषणा या केवळ आणि केवळ सोपस्काराचा भाग ठरेल.

# मराठवाड्यात भूमाफियांचा उच्छाद

मराठवाड्यात संपत्तीच्या खरेदी-विक्रीच्या प्रकरणात अनेक उलाढाली होतात. राज्याचे मंत्री यांच्याविषयी हॉटेल प्रकरणातील निविदेवरून बराच गोंधळ माजला. लातूर व धाराशिव जिल्ह्यातही अशाच भूखंड प्रकरणावर तेथील राजकारणी काही दिवसांपूर्वी चांगलेच चर्चेत आले होते. मराठवाड्यात संपत्तीविषयक अडीअडचणी दिवसेंदिवस वेगवेगळे रूप घेत असल्याचे दिसून येते. महाराष्ट्र व तेलंगणाच्या सीमेवर असलेल्या मराठवाड्यातील नांदेड शहरात अलीकडेच घडलेला एक प्रकार चर्चेत आहे. तेलंगणातील हैदराबाद येथील एल. बी. नगर या भागात राहणाऱ्या एका मध्यमवर्गीय दयानंद ठाकूर नामक कुटुंबीयांना नांदेड शहरात हृदयद्रावक अनुभव आला. कोट्यवधी रुपयांचा भर रस्त्यावर असलेला नांदेडमधील मोक्याचा प्लॉट नावावर करून देण्याच्या कारणावरून बेदम मारहाण करण्यात आली. भर दिवसा रस्त्यावर कपडे फाटेपर्यंत मारहाण करून त्यांना रजिस्ट्री ऑफिसमध्ये घेऊन जाण्यात आले. नांदेड शहरातील आयटीआय परिसरात मुख्य रस्त्यावर अंदाजे ५० कोटी रुपयांपेक्षा अधिक बाजार किंमत असलेल्या मोकळ्या भूखंडावरून ही मारहाण करण्यात आली. त्यांना जबरदस्तीने रजिस्ट्री ऑफिसमध्ये नेऊन मोठ्या भूखंडाची रजिस्ट्री करण्यासाठी भाग पाडत असल्याच्या प्रकाराने खळबळ उडाली. त्यांच्या हाताचे ठसे घेण्यात आले होते. त्यांच्या अंगावरील कपडे मारहाणीमुळे फाटले होते. त्यांना व त्यांच्या कुटुंबीयांना मुका मार देखील लागला. अशा परिस्थितीत भूखंडाची रजिस्ट्री प्रक्रिया सुरू होती. त्यावेळी त्या कार्यालयातील अधिकारीही त्यांना त्यांच्या अवस्थेबद्दल काहीही विचारत नव्हते; परंतु एक माजी आमदार त्या ठिकाणी पोहोचले व त्यांनी पुढील प्रक्रिया थांबविली. तत्पूर्वी हैदराबाद येथील त्या कुटुंबीयांनी शिवाजीनगर पोलीस स्थानकात या संदर्भात तक्रार नोंदविली; परंतु त्यांना देखील पोलिसांकडून म्हणावा तसा प्रतिसाद मिळाला नसल्याचे सांगण्यात आले. नांदेडनंतर असाच काहीसा प्रकार बीड व धाराशिव जिल्ह्यात देखील घडला. प्लॉटवर बेकायदेशीररीत्या ताबा करणे, त्यानंतर त्यामध्ये वाद उत्पन्न करणे व प्रकरण न्यायप्रवीष्ट करणे, अशा माध्यमातून हे भूमाफिया सर्वसामान्य व मध्यमवर्गीयांना त्रासून सोडत आहेत. न्यायालयीन प्रक्रियेत एखादा विषय गेला की मग पोलीसवाले देखील या प्रकरणात हात टाकत नाही. त्यामुळे पोलिसांचा आधार मिळत नसल्याने सेटलमेंट करण्याशिवाय पर्याय नाही, अशी परिस्थिती निर्माण करून गोरगरिबांचे व मध्यमवर्गीयांचे भूखंड हडपण्याची एक टोळीच सध्या मराठवाड्यात कार्यरत झाली आहे. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनीच मराठवाड्यातील या भूमाफियांविरुद्ध कडक कारवाई करावी, अशी मागणी जोर धरत आहे. मोकळा प्लॉट, घर, फ्लॅट व दुकान यांच्या किमती सर्वत्रच दिवसेंदिवस वाढत आहेत. संपत्तीची खरेदी-विक्री व मोकळ्या जागेत पैसे गुंतवून त्यामधून मोठी रक्कम कमविणे हा काहींचा धंदाच होऊन बसला आहे. या उलाढालीमधून पैशांची आवक-जावक प्रमाणात होते. हे लक्षात आलेल्या काही लोकांनी झटपट श्रीमंत होण्याच्या नादात स्वतःचे पाय बेकायदेशीर कामाकडे वळविले आहे. असेच काही लोक भूमाफिया म्हणून मराठवाड्यात उच्छाद मांडत आहे. विशेष म्हणजे भूमाफिया दोन पैशांच्या जीवावर तरुणाईला या प्रकरणात ओढून घेतात. त्यांच्या हातून मारहाण करणे, धमकावून हे असे कृत्य करून त्यांचेही जीवनमान बिघडवीत आहे. अशा भूमाफियांना सरकारी संरक्षण बेकायदेशीररीत्या मिळत आहे. तसेच या लोकांना मदत करण्यासाठी सरकारी यंत्रणा पैशांच्या पुढे झुकत असल्याचे अलीकडे घडलेल्या घटनांवरून दिसून येते. या प्रकारांकडे वरिष्ठ अधिकारीही कानाडोळा करत असल्याने भूमाफिया खालपासून वरपर्यंत पोहोचलेले आहेत की काय, अशी शंका घेण्यास वाव शिल्लक राहतो. अशा भूमाफियांवर वेळीच आवर घालणे अत्यंत आवश्यक आहे. अन्यथा भविष्यात मराठवाड्यात या प्रकरणात खून, हाणामारी, न्यायालयीन प्रकरणे नक्कीच वाढणार आहेत व शेवटी या सर्वांचा त्रास सरकारी यंत्रणेलाच होणार आहे. छोटेसेच का असेना; परंतु स्वतःचे एक घर असावे, अशी सर्वांचीच मनोमन इच्छा असते. याच भावनेतून मध्यमवर्गीय जीवापाड मेहनत करतो. सकाळी उठल्यापासून रात्री उशिरापर्यंत राबणे व स्वतःच्या कुटुंबाचा गाडा हाकण्यासाठी मेहनत घेणे हेच सर्वसामान्यांचे जीवन असते; परंतु अशा सर्वसामान्यांच्या स्वप्नांचा चुराडा करणारी टोळी मराठवाड्यात कार्यरत झाली आहे. मोकळ्या प्लॉटची जुनी कागदपत्रे रजिस्ट्री ऑफिसमधून मिळविणे व त्या आधारावर खोट्या बाँड पत्राच्या आधारे करार करून सदरील प्रकरण न्यायप्रवीष्ट करणारी काही उदाहरणे समोर आली आहे.

# ‘तो’ असा कसा, असा कसा... वेगळा वेगळा वेगळा.!

जगातील मोठ्या लोकसंख्येचे एका भागातील देश एकत्र येऊन व्यापारी संघटना स्थापन करतात, त्यांच्यात अनेक देश सहभागाची इच्छा व्यक्त करतात आणि त्यांच्यात व्यापार-विनिमयासाठी एकच चलन असावे, असा सूर गेल्या काही वर्षांत उमटत असताना त्याची भीती अमेरिकेचे अध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांना वाटते आहे.

एकीकडे चीन आर्थिक महासत्ता झाली आहे, भारत जगातील तिसरी आर्थिक महासत्ता होत आहे आणि दुसरीकडे रशियाला गतवैभव प्राप्त करून देण्यासाठी व्लादीमिर पुतीन यांची धडपड सुरू आहे. हे तीनही देश ‘ब्रिक्स’चे प्रमुख सदस्य आहेत. त्यात ब्राझीलसह अन्य राष्ट्रेही आहेत. ती एकत्र आली, तर अमेरिकेच्या वर्चस्वाला धोका होईल, असा भयगंड ट्रम्प यांच्या मनात आहे.

व्यापारी वृत्तीच्या ट्रम्प यांना पैसा आणि देशाचे हीत कळते म्हणावे, तर तसेही नाही. हिंदीत एक म्हण आहे. तिचा अर्थ ‘बाप किंवा भाऊ मोठा नाही, पण पैसा सर्वात मोठा आहे’ असा आहे. अमेरिकेतील अनेक औद्योगिक संघटना, उद्योजकांनी ट्रम्प यांच्या ‘टॅरिफ नीती’चा फायदा होण्याऐवजी तोटाच होईल, असा इशारा दिला आहे. वेगवेगळ्या संस्थांच्या अहवालात तसे नमूद करण्यात आले आहे; परंतु ट्रम्प यांच्यासारच्या एकाधिकारशाही वृत्तीच्या व्यक्ती कोणाचेच काही ऐकत नसतात. मित्रत्त्वाचा सल्ला त्यांना पसंत पडत नसतो. मित्र म्हणायचे आणि त्याच्याच विरोधात निर्णय घ्यायचा, ही नवी ट्रम्पनीती आहे.

भारत-अमेरिका मैत्रीबद्दल बोलणारे ट्रम्प एवढ्यावरच थांबले नाहीत. त्यांनी दहशतवादाचा पाठिराखा असलेल्या पाकिस्तानशी अमेरिकेने मोठा करार केला. हा करार तेल साठ्यांचा शोध आणि विकासासाठी आहे. एकीकडे भारत रशियाकडून कच्चे तेल खरेदी करतो, म्हणून त्याच्यावर निर्बंध लादायचे आणि दुसरीकडे पाकिस्तानला तेल साठे विकसित करण्यासाठी मदत करायची, ही ट्रम्प यांची दुहेरी नीती आहे. भारताने अमेरिकेशी करार करण्यास विलंब लावला असल्याचा अमेरिकेचा आरोप आहे. भारताच्या बाजारात अमेरिकेची कृषी उत्पादने विकली जावीत, असा तिचा प्रयत्न आहे.




त्यासाठी भारताने आयातशुल्क कमी करावे, असा आग्रह धरला जात आहे. भारताची शेती व्यवस्था अगोदरच अडचणीत आहे. अमेरिका, युरोपीय देशांच्या तुलनेत भारतीय शेतकऱ्यांना कमी अनुदाने दिली जातात. अमेरिका तेथील शेतकऱ्यांना मोठी अनुदाने देऊन कमी किंमतीत भारतात शेतीमाल पाठवण्याच्या तयारीत आहे. अमेरिकन कृषीमाल कमी किंमतीत आयात करण्यास मोठा विरोध असताना सरकार अमेरिकेच्या दबावापुढे झुकण्याची सूतराम शक्यता नाही. भारत आणि अमेरिकेतील व्यापार कराराचे घोडे याच मुद्यावर अडले आहे.

जेव्हा शस्त्रास्त्रे किंवा व्यापाराचा प्रश्न येतो, तेव्हा ट्रम्प भारताच्या प्रचंड लोकसंख्येकडे आणि भारताच्या वाढत्या सामर्थ्याकडे पाहतात. ते भारताचे कौतुकही करतात; पण दुसरीकडे ते कोणत्या ना कोणत्या आघाडीवर भारताला अडकवून ठेवण्याचा प्रयत्नही करतात. यामुळेच त्यांनी पाकिस्तानसोबत २५ टक्के शुल्क आकारून मोठा करार केला आहे. आणखी एक गोष्ट म्हणजे अमेरिका ‘ब्रिक्स’ देशांच्या गटाला स्वतःसाठी धोका मानते. ‘ब्रिक्स’ देश सतत एका सामायिक चलनावर चर्चा करत असतात.

त्यामुळे जागतिक व्यापारात डॉलरचे वर्चस्व कमी होऊ शकते. ट्रम्प यांनाही हे चांगले समजते. त्यांनी हे अनेक वेळा खुल्या व्यासपीठावर सांगितले आहे. व्यापार तूट हे एक निमित्त आहे, त्यांचे खरे लक्ष्य ‘ब्रिक्स’ हे आहे. ट्रम्प यांच्या तोंडातून ते बाहेर आले आहे. ‘ब्रिक्स’ हा अमेरिकाविरोधी देशांचा गट आहे आणि भारत त्याचा सदस्य आहे. हा अमेरिकन चलनावर (डॉलर) हल्ला आहे. आम्ही हे सहन करणार नाही, असे त्यांनी म्हटले आहे. ट्रम्प यांनी अखेर ‘ब्रिक्स’मुळे ही कारवाई केल्याचे मान्य केले.

सध्या बहुतेक जागतिक व्यापार डॉलरमध्ये होतो. हे स्विफ्ट चॅनेलद्वारे होते. समजा भारत रशियाकडून तेल खरेदी करतो, तर तो हा व्यापार डॉलरमध्ये करतो. रुपया आणि रूबलमध्ये नाही. अमेरिकेलाही याचा थेट फायदा होतो. डॉलरचे हे वर्चस्व संपवण्यासाठी ‘ब्रिक्स’मध्ये चर्चा सुरू आहेत. तथापि, यावर अद्याप एकमत झालेले नाही. आता ट्रम्प यांनी उद्यापासून नवीन आयात शुल्क लावण्याची घोषणा केली आहे.

एका नवीन अहवालानुसार, याचा अमेरिकन उत्पादकांवर वाईट परिणाम होऊ शकतो. ‘वॉशिंग्टन सेंटर फॉर इक्विटेबल ग्रोथ’नुसार, उत्पादकांच्या खर्चात दोन टक्क्यांनी वाढ होऊन ४.५ टक्के वाढ होऊ शकते. यामुळे त्यांचा नफा कमी होऊ शकतो. वेतन गोठू शकते. नोकऱ्या गमावू शकतात किंवा कारखाने बंद होऊ शकतात. ट्रम्प प्रशासनाचे म्हणणे आहे, की या ‘टॅरिफ’मुळे बजेट तूट कमी होईल आणि देशांतर्गत उत्पादन वाढेल; परंतु उत्पादकांचे म्हणणे आहे, की त्यांच्यावर सर्व बाजूंनी दबाव आहे.

एका सर्वेक्षणात असे आढळून आले आहे, की कंपन्या या ‘टॅरिफ’चा अर्धा भार ग्राहकांवर टाकतील. कामगार विभागाच्या मते, एप्रिलमध्ये ‘टॅरिफ’ लागू झाल्यानंतर 14 हजार नोकऱ्या गेल्या. मिशिगन आणि विस्कॉन्सिनमधील प्रत्येक पाचपैकी एक नोकऱ्या अशा क्षेत्रात आहेत, ज्यावर ट्रम्प यांच्या व्यवसाय ‘टॅरिफ’चा परिणाम होईल. वीस टक्के इलेक्ट्रॉनिक वस्तू आयात केल्या जातात म्हणून ‘एआय’ गुंतवणुकीवरही परिणाम होईल. येल विद्यापीठाच्या बजेट लॅबचा अंदाज आहे, की ‘टॅरिफ’मुळे कुटुंबांना दरवर्षी २४०० डॉलरपर्यंत नुकसान होऊ शकते. लहान व्यवसायांचे म्हणणे आहे, की ‘टॅरिफ’मुळे त्यांच्या विस्तार योजनांवर परिणाम होत आहे.

ट्रम्प यांच्या नवीन धोरणांमुळे अमेरिकन उत्पादकांसाठी समस्या निर्माण होऊ शकतात. यामुळे त्यांचे खर्च वाढतील. या छोट्या बदलांमुळे वेतनात घट, नोकऱ्यांमध्ये घट आणि कारखाने बंद होऊ शकतात. याचा अर्थ कंपन्यांना कर्मचाऱ्यांना पगार देण्यास अडचण येऊ शकते. ट्रम्प यांनी युरोपीय महासंघ, जपान, फिलीपिन्स, इंडोनेशिया आणि ब्रिटन यांच्यासोबत नवीन व्यापार करार केले आहेत. यामध्ये १५ ते ५० टक्क्यांपर्यंत आयात शुल्क समाविष्ट आहे. ट्रम्प प्रशासनाचे म्हणणे आहे की या शुल्कांमुळे देशाची अर्थसंकल्पीय तूट कमी होईल.देशांतर्गत उत्पादनात मोठी वाढ होईल. ‘मेड इन यूएसए’ लेबल पुन्हा एकदा जगात दिसून येईल; परंतु ‘व्हाईट हाऊस’च्या दाव्याला छेद देणारा एक अहवाल पुढे आला आहे. नवीन अहवालात असे दिसून आले आहे, की उत्पादकांना मोठे नुकसान सहन करावे लागत आहे. स्टील कॉइलच्या किमती पाच ते दहा टक्क्यांनी वाढल्या आहेत. ट्रम्प यांनी परदेशी स्टील आणि अॅल्युमिनियमवर,५० टक्के शुल्क लादल्याने अमेरिकन उत्पादकांना किंमती वाढवण्याची संधी मिळाली आहे, कारण स्पर्धा कमी झाली आहे. जूनमध्ये ह्यअटलांटा फेडह्ने केलेल्या सर्वेक्षणात असे आढळून आले, की कंपन्या नवीन शुल्काचा अर्धा भार ग्राहकांना टाकण्याची योजना आखत आहेत. अर्थशास्त्रज्ञ एर्नी टेडेस्ची यांनी ट्रम्प प्रशासनाचा महागाई नियंत्रणात असल्याचा दावा फेटाळून लावला. त्यांनी सांगितले, की आयात केलेल्या वस्तूंच्या किमती वाढत आहेत. ट्रम्प यांनी आयात कराची घोषणा केल्यानंतर भारतीय भांडवली बाजार अपेक्षेप्रमाणे कोसळला असला, तरी हा दीर्घकालीन परिणाम असणार नाही, तसेच ट्रम्प यांनी चचेर्चे दरवाजे खुले ठेवल्याने त्यातून ‘टॅरिफ’ रचनेत बदल होऊ शकतो.

# मातृत्वातून उद्योजकतेकडे झेप

पूर्वीच्या काळी एकत्र कुटुंब पद्धत होती. त्यामुळे लहान बाळाला काहीही झाले की, घरातील आजी घरगुती उपचार करून बाळाला ठीक करे. आजीबाईचा बटवा म्हणून तो ओळखला जाई. कालपरत्वे उद्योग-व्यवसायामुळे कुटुंबे विभक्त झाली. बाळाला जरा काही झाले की डॉक्टरकडे पालक धाव घेऊ लागले. आजीबाईचा बटवा काळाच्या ओघात मागे पडला. या चक्रातून ती सुद्धा गेली. तिला जाणवलेल्या समस्येवर तिला उपाय सापडला आणि या उपायाचे तिने व्यवसायात रूपांतर केले. ही गोष्ट आहे रिद्धी शर्मा या आईची आणि कोट्यवधी रुपयांची उलाढाल होणाऱ्या तिच्या बेबी ऑरगॅनो या उद्योगाची.

गुजरातच्या जामनगरमधील रिद्धीने कॉलेज संपल्यानंतर पहिल्यांदा काम करायला सुरुवात केली. तेव्हा तिचा पगार महिन्याला फक्त २५०० रुपये होता. ही काही फार मोठी रक्कम नव्हती; परंतु त्यामुळे तिला तिचे आर्थिक स्वातंत्र्य मिळाले. तिला तिच्या आई-बाबांकडे पैसे मागावे लागले नाहीत. २००८ मध्ये विद्यानगरच्या जी. एच. पटेल कॉलेज आ-ॅफ इंजिनीअरिंग अँड टेक्नॉलॉजीमधून आयटीमध्ये बीई पदवी प्राप्त केल्यावर रिद्धीने सुरुवातीला त्याच शहरातील एका आयटी फर्ममध्ये कोडर म्हणून कारकिदीर्ची सुरुवात केली.

पण करिअरच्या एका वळणावर तिच्या लक्षात आले की, ती विपणन कलेत उजवी आहे. तेव्हा तिने कंपनीमध्ये आपले प्रोफाइल बदलून घेतले. मार्केटिंग क्षेत्रातील तिच्या कौशल्यामुळे तिला बढती मिळाली. त्या आयटी फर्मच्या संस्थापकांसोबत थेट काम करण्याची तिला संधी मिळाली. याच फर्ममध्ये असताना रिद्धीची ओळख अहमदाबादमधील ओपन एक्सेलमध्ये काम करणाऱ्या रिपुल शमार्शी झाली. ओळखीचे रूपांतर प्रेमात आणि प्रेमाचे रूपांतर लग्नात झाले. २०११ पर्यंत, दोघेही आपापल्या कंपन्यांमध्ये चांगल्या पदांवर पोहोचले. रिद्धी टीम लीडर आणि रिपुल सीनियर डेव्हलपर व टीम लीडर म्हणून काम करू लागले.

पण आयुष्यात काहीतरी वेगळं करण्याची इच्छा असलेल्या रिद्धी-रिपुल यांनी त्याचवर्षी वेबपिक्सेल टेक्नॉलॉजी सुरू केली. ही कंपनी वेबसाइट डिझाइन आणि डेव्हलपमेंट, मोबाइल ॲप्लिकेशन डेव्हलपमेंट, एसईओ सेवा आणि वेब देखभाल आणि होस्टिंगसारखी सेवा देते. रिपुल आणि रिद्धीने बचतीतून साठवलेले ५०,००० रुपये एकत्र करून वेबपिक्सेल सुरू केले. त्यांनी अहमदाबादमधील पालदी येथील ५०० चौरस फुटांच्या एका छोट्या ऑफिसमधून काम करण्यास



सुरुवात केली. सुरुवातीला ते फक्त दोघेच होते. हळूहळू दोन डेव्हलपर्स आणि एक डिझायनर हे वेब पिक्सेलमध्ये सामील झाले. व्यवसायाच्या पहिल्या वर्षात, त्यांनी २० लाख रुपयांचे उत्पन्न मिळवले.

पूर्णवेळ नोकरी करत वेबपिक्सेल वाढवण्याचा त्यांचा प्रयत्न सुरू होता. त्यांना अमेरिकेतून का-ही क्लायंट मिळाले. दिवसा नोकरी तर संध्याकाळी व्यवसाय अशा कसरती सुरू होत्या. या कठोर वेळापत्रकामुळे त्यांना फक्त ३ ते ४ तासांचीच झोप मिळायची. व्यवसाय जसजसा वाढत गेला तसतसा त्यांची टीम देखील वाढली. सध्या वेबपिक्सेल टेक्नॉलॉजीमध्ये ४० कर्मचाऱ्यांची टीम आहे. ती जगभरातील क्लायंटना सेवा देते.

२०१८ मध्ये, रिद्धीने प्रसूती रजेसाठी ब्रेक घेतला. पहिल्यांदाच आई होणार असल्याने, ती तिच्या बाळासाठी योग्य आरोग्यदायी उत्पादने निवडण्यास उत्सुक होती. नावाजलेल्या ब्रँडच्या बाळांसाठी उपलब्ध असलेल्या उत्पादनांमधील घटकांबद्दल तिला शंका होती. तिच्या ८९ वर्षीय आजीने, तिच्यासोबत काही काळ राहून बाळासाठी घरगुती आयुर्वेदिक उत्पादने तयार केली. उटणे पावडर, हळद, हरभरा पीठ आणि चंदन यांचे मिश्रण तयार केले, जे बाळाच्या त्वचेसाठी फायदेशीर असते. बाळाच्या शरीरावर मालिश करण्यासाठी ही उटणे पावडर पाणी, दही किंवा दुधात मिसळून लावली जाते. तिने ऑलिव्ह ऑइल, गव्हाचे तंतू तेल, बदाम तेल आणि तीळाच्या तेलाच्या मिश्रणापासून घरगुती बाळ मालिश तेल देखील बनवले.

रिद्धीचा बाळांसाठी आयुर्वेदिक आरोग्याचा प्रवास तेव्हा सुरू झाला जेव्हा रिद्धीचे बाळ ४-५ महिन्यांचे होते. तेव्हा त्याचे पोट दुखत होते. तिच्या आजीने बाळाच्या नाभीवर पातळ केलेला हिंग लावला. या उपायामुळे कायान शांत झोपत असे. सहा महिन्यांनंतर तिची आजी तिच्या घरी परतली. रिद्धी देखील आपल्या उद्योगात गुंतली. मात्र कायानसाठी तिला ही घरगुती उत्पादने बनवण्यासाठी वेळ नव्हता. तिने आयुर्वेदिक बेबी केअर उत्पादने शोधली पण तिला विशेषतः बा-ळांसाठी सेवा देणारे कोणतेही भारतीय ब्रँड सापडले नाहीत. ही पोकळी तिला उद्योजक बनवून गेली. मार्च २०२० मध्ये, रिद्धीने २ लाख रुपयांची गुंतवणूक करत बाळांना समर्पित असा बेबीऑगानो हा आयुर्वेदिक ब्रँड लाँच केला. हा व्यवसाय तिने घरातूनच सुरू केला. तिने ब्रँडचे पहिले उत्पादन म्हणून हिंग रोल ऑन बाजारात आणले. हिंग तेल, आल्याचे तेल आणि सोवा तेलाच्या मिश्रणाने पोटदुखी कमी करण्यासाठी हे उत्पादन फायदेशीर आहे असा तिचा दावा होता. एका उत्पादकासोबत भागीदारी करून, रिद्धीने बेबीऑगानोच्या उत्पादनांसाठी आवश्यक असलेले सर्व घटक पुरवले, ज्याची सुरुवात १३ वेगवेगळ्या वस्तूंनी झाली. यापैकी काहींमध्ये रोगप्रतिकारक शक्ती आणि स्मरणशक्तीसाठी बालप्राशन, स्वर्णप्राशन, पोषणासाठी हर्बल चोकोविटा आणि त्वचेच्या काळजीसाठी नॅचरल उटणे यांचा समावेश आहे. या उत्पादनाच्या किमती १५० ते ६०० रुपयांपर्यंत आहेत. या उत्पादनांना प्रिस्क्रिप्शनची आवश्यकता नाही. पहिल्या सहा महिन्यांत या व्यवसायाने दरमहा सुमारे १०,००० रुपयांची उलाढाल केली. ही उलाढाल प्रामुख्याने गुजरात आणि महाराष्ट्रातून झाली. २०२०-२१ च्या आकडेवारीनुसार त्यांच्या पहिल्या वर्षाच्या अखेरीस बेबीऑरगॅनोने ८ लाख रुपये कमावले, तर पुढील वर्षी महसूल ३७ लाख रुपयांपर्यंत वाढला. एका वेबसाइटच्या वृत्तानुसार सध्या कंपनीची उलाढाल ७ कोटी रुपयांपेक्षा अधिक आहे. त्यांची ९०% विक्री ही त्यांच्या स्वतःच्या वेबसाइटवरून येते, तर उर्वरित १०% विक्री ॲमेझॉन आणि फ्लिपकार्ट सारख्या प्लॅटफॉर्मवरून होते. ऑगस्ट २०२३ च्या अखेरीस, बेबीऑरगॅनोला डेव्हएक्स वेंचरकडून १.२५ कोटी रुपयांचा निधी मिळाला. बेबीऑरगॅनो भारताबाहेर स-द्धा वाढत आहे. ब्रँडने अमेझॉन यूएसएद्वारे अमेरिकन बाजारपेठेत प्रवेश केला आहे. यूएई आणि मध्य पूर्वेमध्ये विस्तार करण्याची त्यांची योजना आहे. पुढील आर्थिक वर्षात २५ कोटी रुपयांची उलाढाल करण्याचा कंपनीचा मानस आहे. मातृत्वातून उद्योजकतेकडे झेप घेणारी रिद्धी शर्मा खऱ्या अर्थाने लेडी बॉस आहे.

# रात्री झोपताना चावा किचनमधील हे काळे दाणे



भारतीय स्वयंपाकघरात वेलचीचा वापर गोडधोड पदार्थांमध्ये, चहा किंवा खास पाककृतींमध्ये मोठ्या प्रमाणावर केला जातो. तिचा मोहक सुगंध आणि चव पदार्थांना खास बनवते, पण इतक्यावरच तिचे गुणधर्म थांबत नाहीत. वेलची ही फक्त मसाला नसून आरोग्यासाठी उपयुक्त औषधी गुणांनी युक्त आहे. आयुर्वेदात वेलचीला पचन सुधारक, तणाव कमी करणारी आणि मन-शरीराला ताजेतवाने ठेवणारी म्हणून ओळखले जाते.

रात्री झोपण्याआधी दोन वेलची खाल्ल्यास शरीरावर होणारे परिणाम आश्चर्यचकित करणारे असतात. ही छोटीशी सवय झोपेची गुणवत्ता सुधारते, वजन कमी करण्यास मदत करते आणि तोंडाच्या आरोग्यासाठीही फायदेशीर ठरते.

झोपेची गुणवत्ता सुधारते

सततचा ताण, चिंतेमुळे अनेकांना झोप नीट लागत नाही. अशावेळी रात्री झोपण्याआधी दोन वेलची खाल्ल्यास मन शांत होते आणि मेंदूमध्ये आनंदी भावना निर्माण करणारे हार्मोन्स संतुलित होतात. वेलचीतील नैसर्गिक घटक तणाव कमी करतात आणि नसांवरील ताण हलका करतात. त्यामुळे शरीर रिलॅक्स होते आणि झोप लवकर लागते.

वजन कमी करण्यात मदत

वेलचीमध्ये फायबर, पोटॅशिअम, मॅग्नेशिअम आणि अँटिऑक्सिडंट्स मुबलक प्रमाणात असतात. हे घटक पचनक्रिया सुरळीत ठेवतात आणि शरीरातील चरबी कमी करण्यास मदत करतात. रात्री झोपण्यापूर्वी वेलची खाल्ल्यास मेटाबॉलिझम वेगाने कार्य करतो, ज्यामुळे कॅलरीज जाळण्याची प्रक्रिया वेगवान होते आणि हळूहळू वजन कमी होऊ लागते.

पचन सुधारते आणि ॲसिडिटी कमी करते

रात्री जड किंवा मसालेदार अन्न खाल्ल्यानंतर पोट बिघडणे, ॲसिडिटी किंवा गॅस होण्याची समस्या अनेकांना होते. वेलचीतील तेलं आणि नैसर्गिक एन्झाईम्स पचनरसांची निर्मिती वाढवतात. त्यामुळे अपचन आणि जडपणा कमी होतो. नियमित सेवनाने पोट हलके वाटते आणि ॲसिडिटीची समस्या टाळता येते.

तोंडाची दुर्गंधी आणि संसर्ग कमी होतो

वेलचीतील अँटीबॅक्टेरियल गुणधर्म तोंडातील जंतूंचा नाश करतात. झोपण्यापूर्वी वेलची चावून खाल्ल्याने सकाळी उठल्यावर येणारी दुर्गंधी कमी होते. यामुळे हिरड्या आणि दात सुदृढ राहतात. नियमित सेवनाने तोंडातील संसर्ग, सूज आणि वेदना कमी होतात.

शरीरातील सूज आणि थकवा कमी करतो

वेलचीमध्ये डिटॉक्सिफायिंग गुणधर्म असतात, जे शरीरातील हानिकारक पदार्थ बाहेर टाकण्यास मदत करतात. दिवसभराच्या थकव्यामुळे रात्री झोपताना जडपणा जाणवत असल्यास वेलची खाल्ल्याने ताजेतवाने वाटते. ती रक्ताभिसरण सुधारते, थकवा आणि स्नायूंची जडजड कमी करते आणि दुसऱ्या दिवशी सकाळी ऊर्जा मिळवून देते.

# खराब कोलेस्ट्रॉल कमी आणि हृदयविकाराचा धोका कमी करण्यासाठी रिकाम्या पोटी आल्याचे पाणी

आजच्या जीवनशैलीमुळे हृदयविकार, उच्च रक्तदाब आणि कोलेस्टेरॉल वाढण्याच्या समस्या झपाट्याने वाढत आहेत. चुकीच्या आहारामुळे, तणावामुळे आणि शारीरिक हालचालींच्या अभावामुळे शरीरातील वाईट कोलेस्टेरॉल वाढते आणि हळूहळू गंभीर आजारांना आमंत्रण मिळते. कोलेस्टेरॉल हा शरीरातील पेशींमध्ये आढळणारा मेणासारखा घटक असून तो चांगल्या आणि वाईट या दोन प्रकारांमध्ये विभागला जातो.



वाईट कोलेस्टेरॉलची पातळी वाढल्यास रक्तवाहिन्यांमध्ये चरबी जमा होऊन हृदयविकार आणि स्ट्रोकचा धोका वाढतो. औषधांवर अवलंबून राहण्याऐवजी रोजच्या आहारात काही नैसर्गिक सवयींचा समावेश केल्यास ही समस्या मोठ्या प्रमाणात टाळता येते. त्यातही आले हे एक असे घरगुती घटक आहे जे केवळ चव वाढवत नाही तर हृदयाचे आरोग्यही सुधारते.

आल्याचे पाणी कोलेस्टेरॉलसाठी कसे फायदेशीर

आल्यामध्ये जिंजरोलसारखे बायोॲक्टिव्ह कंपाउंड असतात, जे रक्तातील वाईट कोलेस्टेरॉल (छऊछ) आणि ट्रायग्लिसराइड्सची पातळी कमी करण्यात मदत करतात. नियमित सेवनाने रक्तवाहिन्यांमध्ये चरबीचा साठा कमी होतो आणि हृदयाचे कार्य सुरळीत राहते. आल्याचे पाणी पचन सुधारते, शरीरातील सूज कमी करते आणि रक्ताभिसरण सुधारते.

आल्याचे पाणी तयार करण्याची सोपी पद्धत

एका पॅनमध्ये एक ग्लास पाणी घेऊन त्यात आलेचे तुकडे किंवा किसलेले आले घाला. हे पाणी उकळत ठेवा आणि अर्धे होईपर्यंत उकळू द्या. नंतर गॅस बंद करून पाणी गाळून घ्या. हे पाणी कोमट झाल्यावर रिकाम्या पोटी प्यायल्यास सर्वोत्तम परिणाम मिळतात.

सकाळी रिकाम्या पोटी सेवन करण्याचे फायदे

रिकाम्या पोटी आल्याचे पाणी प्यायल्याने शरीरातील चयापचयक्रिया वेगाने होते आणि कोलेस्टेरॉलची पातळी नियंत्रणात राहते. तसेच हे पाणी वजन कमी करण्यात, रक्तातील साखर स्थिर ठेवण्यात आणि पचन सुधारण्यातही मदत करते.

हृदयासाठी संरक्षणात्मक परिणाम

आल्याचे पाणी नियमित घेतल्यास रक्तदाब स्थिर राहतो, रक्तातील चरबी कमी होते आणि हृदयाला पुरेसा ऑक्सिजन मिळतो. त्यामुळे हृदयविकार, ब्लॉकेज आणि स्ट्रोकचा धोका लक्षणीयरीत्या कमी होतो.

कोलेस्ट्रॉल कमी करण्यासाठी आल्याचे पाणी

रोगप्रतिकारकशक्ती वाढवणारे गुणधर्म

आल्यामध्ये अँटीऑक्सिडंट्स मुबलक प्रमाणात असल्याने शरीरातील सूज कमी होते, रोगप्रतिकारक शक्ती वाढते आणि संसर्गापासून संरक्षण मिळते. त्यामुळे हे साधे पेय आरोग्यासाठी रामबाण ठरते.

# रिकाम्या पोटी लिंबू पाणी घेताय? मग हे वाचाच

लिंबू पाणी हे एक घरगुती पेय आहे. घरी आलेल्या पाहुण्यांनाही आपण लिंबू सरबत देत असतो. मात्र यापलीकडे वजन कमी करण्यासाठी अनेकांना रिकाम्या पोटी लिंबू पाणी घेण्याची सवय असते. सकाळी उपाशीपोटी कोमट पाण्यात लिंबू घालून अनेक जण पितात. मात्र तुम्हाला माहित आहे का रिकाम्या पोटी लिंबू पाणी घेण्याचे फायदे असतील तरीही ते काहींना घातक ठरू शकते. त्यामुळे रिकाम्यापोटी लिंबू पाणी घेताना काही काळजी घेणे गरजेचे आहे.

लिंबू पाण्याचे फायदे

लिंबू पाण्यात व्हिटॅमिन सी भरपूर प्रमाणात असते, जे शरीराला अनेक प्रकारे फायदेशीर ठरते. यामुळे रोगप्रतिकारक शक्ती वाढते. शरीरातील विषारी पदार्थ काढून



टाकण्यास मदत होते. त्वचा निरोगी आणि चमकदार बनते. तसेच सकाळी लिंबू पाणी घेतल्याने उर्जेची पातळी चांगली राहते. मात्र ज्यांना पोटाच्या समस्या, दातांच्या समस्या असतात त्यांनी लिंबू पाणी घेणे टाळावे.

याचे कारण म्हणजे लिंबूमध्ये जास्त प्रमाणात सायट्रिक ॲसिड असते जे काही लोकांसाठी हानिकारक ठरू शकते. यामुळे छातीत जळजळ आणि ऍसिडिटी वाढू शकते. तसेच दातांच्या इनॅमलवर परिणाम होतो, ज्यामुळे दात कमकुवत आणि संवेदनशील होऊ शकतात.

रिकाम्या पोटी लिंबू पाणी कोणी पिऊ नये?

ज्या लोकांना कायम पोटात अल्सर, ऍसिडिटी, छातीत जळजळ, पोट फुगणे असा त्रास होतो त्यांनी रिकाम्या पोटी लिंबू पाणी घेणे टाळावे. लिंबूमधील तीव्र आम्ल पोटाच्या आतील भागाला अधिक संवेदनशील बनवू शकते.

दातांचा त्रासः

जर तुम्हाला दातांच्या समस्या असतील तर लिंबू पाणी घेणे टाळावे. त्यामुळे तुमच्या दातांना आणखी नुकसान होऊ शकते.

मूत्रपिंड आणि रक्तदाबः

मूत्रपिंडाचा आजार किंवा कमी रक्तदाब असलेल्या लोकांनी रिकाम्या पोटी लिंबू पाणी घेण्यापूर्वी डॉक्टरांचा सल्ला घ्यावा.

या गोष्टी लक्षात ठेवा

जर तुम्हाला लिंबूपाणी पिण्याची इच्छा असेल तर कोमट पाण्यात अर्धे लिंबू टाकून घ्यावे. लिंबूचे प्रमाण हे कमी ठेवा. लिंबूपाणी पिल्यानंतर स्वच्छ पाण्याने तोंड धुवा ज्यामुळे दातांना नुकसान होणार नाही. ज्यांना कमी रक्तदाब किंवा किडनीचा त्रास आहे त्यांनी डॉक्टरांचा सल्ला घेतल्यानंतरच ते सेवन करावे. जर तुम्हाला ॲसिडिटीची समस्या असेल तर रिकाम्या पोटी लिंबूपाणी पिणे टाळावेच. या समस्या असलेल्या लोकांनी योग्य वेळी, योग्य प्रमाणात आणि योग्य पद्धतीने लिंबू पाणी घ्यावे.

# प्लास्टिकच्या पिशव्यांमध्ये भाज्या साठवल्याने हृदयविकाराचा धोका

काही महिला बाजारहाट करून थेट प्लास्टिकच्या पिशव्यांसहच भाज्या फ्रीजमध्ये ठेवतात. पाहता पाहता ही सवय घराघरात रूजली आहे. पण ज्या गोष्टी सोयीसाठी केल्या जातात, त्यामध्ये आरोग्याचा गंभीर धोका लपलेला असेल, तर? अलीकडील शास्त्रीय अभ्यासातून धक्कादायक बाबी समोर आल्या आहेत. बाजारातून आणलेल्या भाज्या, डबे, थंडपेय, तयार अन्न हे सगळं काही प्लास्टिकमध्ये साठवण्याचा प्रघात वाढला आहे.



पण अशा वस्तू फ्रिजमध्ये ठेवताना आपल्या नकळत शरीरात घातक घटक पोहोचत आहेत. फक्त काच किंवा प्लास्टिकच्या बाटल्यांवरच नव्हे, तर आपण उघडण्या-बंद करण्याच्या प्रत्येक कृतीतूनही आरोग्य धोक्यात टाकत आहोत. संशोधन सांगतं की, मायक्रोप्लास्टिक हे आरोग्याला धीम्या गतीने पण खोल घाव घालणारं संकट ठरत आहे.

मायक्रोप्लास्टिक म्हणजे काय?

आपण वापरत असलेल्या प्लास्टिक वस्तूंमध्ये काही सूक्ष्म इतके छोटे घटक असतात, जे डोळ्यांना दिसतही नाहीत. यांनाच मायक्रोप्लास्टिक आणि नॅनोप्लास्टिक असे म्हणतात. हे अन्न, पाणी, हवा, मीठ, टी बॅग्स आणि अगदी ड्रिंक्समध्येही आढळले आहेत. जेव्हा आपण प्लास्टिकच्या वस्तू उघडतो, बंद करतो, त्या गरम करतो किंवा त्या प्लास्टिकच्या संपर्कात अन्न ठेवतो, तेव्हा हे कण त्यामध्ये मिसळू लागतात. ही प्रक्रिया इतकी सहज होते की आपल्याला त्याची कल्पनाही येत नाही.

शरीरात जाऊन काय घडतं?

हे मायक्रोप्लास्टिक शरीरात गेल्यावर आपल्याला कोणतेही लक्षण दिसत नाही, पण ते आतून आपल्याला पोखरत असते. वैज्ञानिक संशोधनात असं स्पष्ट झालं आहे की हे सूक्ष्म कण फुफ्फुसांमध्ये, मेंदूमध्ये आणि रक्तातसुद्धा पोहोचतात. इतकंच नव्हे तर ते शरीराच्या ऊतींमध्ये मिसळून शरीराच्या विविध भागांमध्ये फिरू लागतात. यामुळे सूज, हार्मोनल बिघाड आणि अनेक दीर्घकालीन आजारांचा धोका वाढतो.

हृदयविकार आणि स्ट्रोकचा धोका वाढतोय

नुकत्याच प्रसिद्ध झालेल्या एका जागतिक अभ्यासात धक्कादायक निष्कर्ष समोर आले आहेत. या संशोधनानुसार, ८०% लोकांच्या रक्तात मायक्रोप्लास्टिक आढळले. विशेष म्हणजे, ५८% लोकांच्या रक्तवाहिन्यांमध्ये हे कण सापडले, जे थेट हृदयाशी संबंधित आहेत. याचा अर्थ असा की हृदयविकार, हाय ब्लडप्रेशर, अर्धांगवायू यासारख्या आजारांची शक्यता अनेक पटींनी वाढली आहे. हे कण इतके सूक्ष्म आहेत की त्यांना बाहेर काढणे जवळपास अशक्य आहे.

प्लास्टिकच्या पिशव्या वापरणं किती घातक?

आपल्या दैनंदिन जीवनात प्लास्टिक इतकं घुसलं आहे की ते टाळणं कठीण वाटतं. मात्र प्लास्टिकमध्ये ठेवलेलं अन्न फ्रीजमध्ये गेलं की त्या अन्नात सूक्ष्म प्लास्टिक मिसळू लागते. फळं, भाज्या, उरलेलं अन्न किंवा पाणी प्लास्टिकच्या डब्यांमध्ये ठेवणं ही केवळ सोय नाही, तर आरोग्यासाठी एक अज्ञात स्फोटक टिकिंग बॉम्ब ठरत आहे. आपल्याला वाटतं आपण अन्न सुरक्षित ठेवलं, पण त्याच्या आतील पोषणमूल्यं कमी होत असून, घातक कण वाढत आहेत.

उपाय काय?

प्लास्टिक पूर्णपणे टाळणं शक्य नसलं, तरी त्याचा पर्याय वापरणं आपल्या हातात आहे. भाज्या आणताना कापडी पिशव्या नेणं ही सवय लावा. घरी आल्यानंतर भाज्या आणि फळं स्टीलच्या किंवा मातीच्या भांड्यांमध्ये साठवा. तुम्ही नेट बॅग्स, बांबूच्या टोपल्या वापरू शकता. पाण्यासाठी काचेच्या बाटल्या आणि अन्नसाठवणुकीसाठी स्टीलचे डबे वापरणं हाच एकमेव टिकाऊ आणि सुरक्षित उपाय आहे. सुरुवात लहान बदलांपासून करा, पण ती वेळेत करा.ही माहिती तुमच्या घरातील प्रत्येकासाठी उपयोगी आहे. ही सवय आताच दुर्लक्षित नाही केली तर उद्या आरोग्याची मोठी किंमत चुकवावी लागेल. तुम्ही आजपासूनच घरातल्या प्लास्टिकला निरोप दिलात, तर कदाचित उद्याच्या गंभीर आजारांपासून स्वतःला वाचवू शकाल.

# दही दूधच नाही, तर श्रावण महिन्यात 'हे' पदार्थ खाण्यासही पूर्ण बंदी, खरं कारण काय?

श्रावण आला की भगवान शंकराची पूजा, व्रत, उपवास आणि भक्तिभावाने वातावरण भारलेलं असतं. श्रावण महिन्याला धार्मिक दृष्टिकोनातून अतिशय महत्त्व आहे आणि म्हणूनच अनेक बंधनं आणि नियम या काळात पाळले जातात. तुम्हीही ऐकलं असेल झ 'श्रावणात दूध नको, दही नको, भाजी नको!' पण कधी विचार केलात का, यामागे नेमकं काय कारण आहे? हे सगळं केवळ धमार्पुरतं मर्यादित आहे का? की यामागे शास्त्रीय आधारही आहे?

आपल्या आजी-आजोबांनी सांगितलेल्या या नियमांचं खरं कारण आता न्यूट्रिशनिस्ट नीती शर्मा यांनी सांगितलं आहे आणि त्यावरून हे लक्षात येतं की ही बंधनं केवळ धार्मिक नव्हे तर पूर्णतः वैज्ञानिक आहेत. चला तर मग, जाणून घेऊया कोणते पदार्थ का टाळावेत आणि त्यामागचं खरं कारण काय आहे.

पावसाळ्यात का टाळाव्यात पालेभाज्या आणि वांगी?

श्रावण महिन्यात सर्वत्र आर्द्रता असते, ज्यामुळे बुरशी, जीवाणू आणि इतर संसर्गजन्य घटक हवेत आणि अन्नात वाढतात. पालेभाज्या आणि वांगी यासारख्या भाज्यांमध्ये या दिवसात सहज कीटक असू शकतात. दिसायला ताजी वाटणारी भाजी प्रत्यक्षात संक्रमित असू शकते. शिवाय वांगी हे पचायला जड असतात, त्यामुळे अशा हवामानात त्याचे अपचन होण्याची शक्यता वाढते. त्यामुळे केवळ धार्मिक नव्हे तर आरोग्यदृष्ट्याही या भाज्या टाळणं फायदेशीर ठरतं.

दूध आणि दही टाळण्यामागे काय कारण आहे?

श्रावणात दूध, दही, ताक किंवा रायता खाणं टाळण्याचा सल्ला बहुतेकांना मिळतो. यामागे धार्मिकता आहेच, पण तितकंच महत्त्वाचं म्हणजे त्यामागचं आरोग्यविज्ञान. पावसाळ्यात जनावरे ज्या गवतावर चरतात, त्यात बुरशी किंवा कीटक असू शकतात, ज्याचा थेट परिणाम त्यांच्या दुधाच्या गुणवत्तेवर होतो. हे दूषित दूध पचायला जड असतं आणि त्यातून अपचन, गॅस किंवा ॲसिडिटी सारख्या समस्या होऊ शकतात. त्यामुळे या काळात हे पदार्थ टाळले जातात.

रायता, कढी, ताक हे का पचत नाही श्रावणात?

बऱ्याचदा लोक या ऋतूमध्ये कढी, रायता किंवा ताकासारखे थंड पदार्थ खाणं पसंत करतात. पण ही फूड्स प्रकृतीनुसार 'थंडी' वाढवणारी असतात. या दिवसात शरीरातील पाचनशक्ती काहीशी मंदावलेली असते. त्यामुळे हे पदार्थ अपचन, गॅस, किंवा पोटदुखी निर्माण करतात. शिवाय हवेमध्ये असलेल्या जंतूंमुळे या पदार्थांमध्ये बाह्य संक्रमन होण्याचा धोका वाढतो.



त्यामुळे डॉक्टरही या काळात हे पदार्थ टाळण्याचा सल्ला देतात.

धार्मिकता आणि सायन्सचं संयोजन

श्रावण महिन्यात फक्त आहार नव्हे, तर आहाराची शुद्धताही महत्त्वाची मानली जाते. दूध आणि त्यापासून बनणाऱ्या गोष्टी, जर त्या दूषित ठरल्या तर त्या फक्त शरीराला नव्हे तर मानसिक आरोग्यालाही नुकसान पोचवू शकतात. पावसाळ्यात संसर्ग वाढतो आणि इम्युनिटी घटते. त्यामुळे जे खाणं आपल्या शरीराला सहन होत नाही, त्याचा पूर्णतः त्याग करणं ही धार्मिक परंपरेमागची शुद्धता आणि विज्ञान यांचं उत्तम उदाहरण आहे.

पथ्यं पाळणं केवळ परंपरेचा भाग नव्हे, तर उत्तम आरोग्याचं रहस्य

आपल्या पूर्वजांनी सांगितलेली पथ्यं केवळ धार्मिक बंधन नव्हती, तर त्या काळात आरोग्य सांभाळण्याचा मार्ग होती. पावसाळ्यात रोगप्रतिकारक शक्ती कमी असते, त्यामुळे शरीराला सहज त्रास होतो. अशा वेळी हलका, ताजा आणि पचायला सोपा आहार घेणं आरोग्यदृष्ट्याही उपयुक्त ठरतं. त्यामुळे पारंपरिक आहार नियमांचं पालन करणं म्हणजे जुन्या पद्धतीने नव्या आरोग्याचं रक्षण करणं होय.



श्रावण महिना हा केवळ भक्तिभावाचा नव्हे, तर शरीराची आणि मनाची शुद्धी साधण्याचा काळ आहे. यामध्ये सांगितलेल्या आहार नियमांमागे फक्त श्रद्धा नाही, तर ठोस विज्ञान दडलेलं आहे. त्यामुळे हे नियम पाळताना आपण अंधश्रद्धा न म्हणता, ते वैज्ञानिक दृष्टिकोनातून समजून घेतले पाहिजेत. आपल्या घरातल्या जुन्या परंपरांना नव्या नजरेने पाहिलं, तर त्या आरोग्याचं गुपित सांगतात आणि तेच श्रावण महिन्याचं खऱ्या अर्थाने महत्त्व आहे.

# केळी, सफरचंद सालीसकट खाल्ल्यानं काय फायदे होतात ?



आपण फळं किंवा भाज्या खाण्याआधी त्यांची सालं सोलतो, पण खरोखरच ही सालं टाकून देणं गरजेचं असतं का? अनेक फळं आणि भाज्यांची सालं ही पोषणमूल्यांनी परिपूर्ण असतात. योग्यरीत्या धुतली आणि साफ केलेली सालं खाणं हे तुमच्या आरोग्यासाठी अधिक फायदेशीर ठरू शकतं.

सफरचंदाचं साल 'क्वेसेर्टीन' या अँटीऑक्सिडंटचं मोठं स्रोत आहे, जे रोगप्रतिकारक शक्ती वाढवतं. बटाट्याच्या सालीत पोटॅशिअम आणि लोहतत्त्व असतं, तर काकडीच्या सालीत असतो अविघटनशील फायबर, जो पचन सुधारतो. केळ्याच्या सालीमध्ये 'ट्रिप्टोफॅन' नावाचं अमिनो आम्ल असतं, जे 'सेरोटोनिन' मध्ये रूपांतरित होऊन मन प्रसन्न ठेवतं. कलिंगडाच्या सालीचा पांढरा भाग 'सिट्रुलीन' नावाच्या अमिनो आम्लामुळे हृदयासाठी फायदेशीर आहे. तर संत्र्याच्या सालीत सामान्य फळभागाच्या तिप्पट व्हिटॅमिन सी आणि अधिक फायबर असतो. साली काढल्याने त्या फळांमधील अध्यार्हून अधिक पोषणमूल्य निघून जातात. विशेषतः गाजर, बीट, सफरचंद, बटाटा यासारख्या फळभाज्यांची सालं खाणं फायदेशीर ठरतं, फक्त ती नीट धुतलेली आणि स्वच्छ असावी.

पण सालींमध्ये कीटकनाशकं किंवा धुळीचे अंश असू शकतात, म्हणून त्यांना नीट धुणं, गरम पाण्यात बुडवून ठेवणं किंवा मीठ व सोड्याने धुणं हे उपाय उपयुक्त ठरतात.

जर काही साली खाणं शक्य नसेल, तरी त्याचा सर्जनशील वापर करा. संत्रा, मोसंबी, सफरचंदाच्या साली वाळवून चहा व काढा बनवण्यासाठगी वापरता येतात तर बटाट्याच्या सालींचे कुरकुरीत चिप्स किंवा भाज्यांच्या सालींपासून सूपसाठी स्टॉक तयार करता येतो.

तर पुढच्या वेळी फळं किंवा भाज्या सोलताना थांबा, आणि विचार करा ही साल टाकायची की खूप उपयोगी ठेवायची?

# स्वत:च्या मुलींच्या मदतीने सुरू असलेल्या सेक्स रॅकेटचा पदार्फाश; दोन महिलांना अटक

**■ बातमी /लेख, प्रीती दिपक नाईक**

दहिसर येथील एका सेक्स रॅकेटचा गुन्हे शाखेच्या अधिकार्यांनी पदार्फाश करून दोन महिलांना अटक केली आहे. त्यांच्या तावडीतून पोलिसांनी तीन मुलींची सुटका केली असून त्यात एका अल्पवयीन मुलीचा समावेश आहे. या तिन्ही मुलींना कांदिवलीतील महिला सुधारगृहात पाठवण्यात आले आहेत. धक्कादायक म्हणजे स्वतःच्या मुलीच्या मदतीने दोन्ही आरोपी महिला सेक्स रॅकेट चालवत असल्याचे तपासात उघडकीस आले आहे.मुंबई पर्यटन



मिळालेल्या माहितीनुसार, शहरातील विविध हॉटेल, लॉज आणि गेस्टहाऊसमध्ये काही महिला ग्राहकांच्या मागणीनुसार त्यांच्यासोबत त्यांच्या परिचित तरुणींना वेश्याव्यवसायासाठी पाठवत असल्याची माहिती युनिट बाराच्या अधिकर्यांना मिळाली होती. या माहितीची शहानिशा करण्यासाठी पोलिसांनी एका महिलेचा मोबाइल क्रमांक मिळवून तिच्याकडे काही तरुणींची मागणी केली होती. फोनवरूनच आर्थिक व्यवहार केल्यानंतर तिला काही तरुणींना घेऊन दहिसर येथील एका फॅमिली रेस्ट्रॉरंटमध्ये बोलावण्यात आले.

ठरल्याप्रमाणे बुधवारी (30 जुलै) तिथे दोन महिला तीन तरुणींसोबत आल्या होत्या. बोगस ग्राहकासोबत आर्थिक व्यवहार सुरू असताना प्रभारी पोलीस निरीक्षक सचिन गवस व त्यांच्या पथकाने तिथे छापा टाकून या दोन्ही महिलांना चौकशीसाठी ताब्यात घेतले. त्यांच्या तावडीतून पोलिसांनी तीन तरुणींची सुटका केली असून त्यातील एक तरुणी अल्पवयीन तर दोन तरुणी त्यांच्याच मुली असल्याचे उघडकीस आले. धक्कादायक म्हणजे गरीबीला कंटाळून त्यांची आई त्यांच्या मदतीने सेक्स रॅकेट चालवत असल्याचे निष्पन्न झाले होते.

या घटनेनंतर पोलिसांनी या दोन्ही महिलांना अटक केली आहे. त्यांच्याविरुद्ध भारतीय न्याय सहिता, पिटा आणि पोक्सो कलमांतर्गत गुन्हा दाखल करण्यात आला आहे. याच गुन्ह्यांत त्या दोघीही पोलीस कोठडीत आहे. तिन्ही तरुणींना मेडीकलनंतर कांदिवलीतील बोईसरच्या महिला सुधारगृहात पाठविण्यात आल्याचे प्रभारी पोलीस निरीक्षक सचिन गवस यांनी सांगितले.

# बाळ समीधाचं असेल, पण माझं नाही! पुण्यातील जोडप्याने तान्हुल्याला मृत्यूच्या दाढेत ढकललं

**■मुंबई । प्रतिनिधीः** पाच दिवसांच्या तान्हुल्याला उड्डाणपुलाखाली निर्जन स्थळी मृत्यूच्या तोंडात ढकलून चक्क माता-पिताच पसार झाल्याची घटना नुकतीच घडली. पुण्यातील सांगवी पोलिसांनी उत्तम कामगिरी करून फरारी आरोपी शोधले आणि हा हृदयद्रावक प्रकार उघडकीस आणला. आरोपी प्रतीक तुपे, वय 24 वर्ष, कामशेत, आणि समीधा तुपे, वय 27 वर्ष, कामशेत, यांनी तिसऱ्या बाळास रुग्णालयात जन्म दिला. मात्र, बाळ माझे नाही, असा संशय आरोपी पित्याने व्यक्त केला.



काय आहे प्रकरण?

दोन्ही पती-पत्नी आरोपींनी मिळून 18 जुलै रोजी या नवजात बालकास कासारवाडी येथील उड्डाणपुलाखाली सोडून पळ काढला होता. आरोपी माता समीधा हिला पहिल्या पतीपासूनही एक अपत्य असून, पहिल्या पतीला सोडल्यानंतर आरोपी प्रतीकपासूनही दुसरे अपत्य आहे. त्यानंतर पुन्हा झालेले अपत्य स्वतःचे नसल्याच्या संशयावरुन आरोपी प्रतीकच्या दबावातून या नवजात बालकास उघड्यावर बेवारस सोडून देण्याचा अपराध दोन्ही आरोपींनी केला आहे. पिंपळे गुरव येथील कल्पतरु सोसायटीशेजारी नाशिक फाटा-कासारवाडी उड्डाणपुलाखाली पाच दिवसांचे नवजात अर्भक सापडले आणि सांगवी पोलिसांची आई-वडील शोधण्याची मोहीम सुरू झाली. पोलिसांनी सीसीटीव्हीच्या आधारे तपास सुरू केला. प्राथमिक तपासात एक पुरुष व महिला लहान बाळाला दुचाकीवर येऊन येथे सोडून गेल्याचे दिसले. मात्र, सीसीटीव्हीत गाडीचा क्रमांक स्पष्ट दिसत नव्हता. परिसरातील अनेक सीसीटीव्ही सुरू नसल्यानेही अडचण वाढली. सांगवीच्या वरिष्ठ पोलिस निरीक्षक जितेंद्र कोळी यांच्या मार्गदर्शनाखाली उपनिरीक्षक चक्रधर ताकभाते, महादेव भालेराव, यांच्यासह पोलिस शिपाई विजय पाटील, राहुल मोघे, सचिन तुपे, सुनीता रावत यांच्या पथकाने धागेदोरे पकडून अखेर दोन्ही आरोपींना कामशेत येथील राहत्या घरातून शिताफीने पकडले. दुसरीकडे, नागपूर पोलिस आयुक्त डॉ. रवींद्रकुमार सिंगल यांनी शहर पोलिस दलातील चार पोलिस कर्मचाऱ्यांना बडतर्फ तर एकाला निलंबित केले. या कारवाईमुळे पोलिस दलात खळबळ उडाली आहे. बडतर्फ कर्मचारी कळमना पोलिस ठाण्यात कार्यरत होते. संदीप यादव व पंकज यादव या दोघांना अभियांत्रिकीच्या विद्यार्थ्यांकडून खंडणी वसूल केल्याप्रकरणात मनोज घाडगे व भूषण साकडे हे दोघे पोलिस चौकीतच जुगार खेळताना आढळल्याने चौघांविरुद्ध बडतफीची कारवाई करण्यात आली.

# वर्गमैत्रिणीने नोकरीच्या आमिषाने घातला ४ लाखांना गंडा

**■नाशिक । प्रतिनिधीः** मुलास नोकरी लावून देण्याचे आमिष दाखवून दोन भामट्यांनी एका महिलेची चार लाख रुपयांची फसवणूक केल्याचे उघडकीस आले आहे. याप्रकरणी संशयित भारती प्रमोद कुमावत (रा. लेखानगर, शिवाजी चौक, नाशिक), स्वप्निल रामदास परदेशी (रा. मनमाड, ता. नांदगाव) यांच्याविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, फियार्दी ज्योती लक्ष्मीकांत गायकवाड (वय ४४, रा. तुळजाभवानीनगर, पाथर्डी शिवार, नाशिक) या मुलासाठी नोकरी शोधत होत्या. दरम्यान फियार्दी गायकवाड यांच्या मुलाची वर्गमैत्रीण भारती प्रमोद कुमावत हिने ओळखीच्या स्वप्निल रामदास परदेशी यांच्यामार्फत सरकारी नोकरी लावून देते, त्यासाठी चार लाख रुपये द्यावे लागतील लागतील. ती ओळखीची असल्याने तिच्यावर विश्वास ठेवून गायकवाड यांनी तयारी दर्शविली. भारतीने एकदिवस परदेशी याच्यासोबत फियार्दी व त्याच्या मुलाचे फोनवर बोलणे करून दिले. त्यानंतर गायकवाड यांनी २१ जून ते ६ जुलै २०२४ दरम्यान वेळोवेळी त्याच्या खात्यावर फोनपेद्वारे चार लाख रुपये पाठविले.

फियार्दी गायकवाड यांचा मुलगा रितेश व त्या स्वतः परदेशी व भारती कुमावत यांना मुंबईत सीएसटी येथे भेटले. त्यावेळी त्याने भारतीचे आता प्रोमशन होऊन तिची बढती चीफ इंजिनीअर म्हणून होणार आहे. तिच्या रिक्त जागेवर रितेशला ज्युनिअर इंजिनीअर सेंट्रल पब्लिक वर्क डिर्पाटमेंट, संभाजीनगर येथे नेमणूक करून देण्याचे ठरले.

काही काळ होऊनही त्याला नोकरीबाबत कोणतेच पत्र न आल्याने त्यांनी भारती व स्वप्निल यांना वारंवार विचारणा केली. मात्र त्यांनी उडवाउडवीची उत्तरे दिली. स्वप्निलने रितेश यांना बँक ऑफ महाराष्ट्र मनमाड शाखेचा एक चेक दिला. तो रितेश यांना वटवण्यासाठी टाकला असता त्या चेकवर स्टॉप पेमेंट केल्याचे समजले. गायकवाड यांनी स्वप्निलशी संपर्क साधला. त्याने पुन्हा चेक भरण्यास सांगितला. मात्र, तो तीन वेळा परत आला. त्यातून फसवणूक झाल्याचे लक्षात येताच रितेश यांच्या आईने स्वप्निल परदेशी व भारती कुमावत यांच्याविरुद्ध इंदिरानगर पोलीस ठाण्यात फसवणुकीची फिर्याद दिली. पुढील तपास पोलीस हवालदार पारणकर करीत आहेत.

# शेअर मार्केटमधील गुंतवणुकीच्या बहाण्याने 1.78 कोटींची फसवणूक

**■मुंबई । प्रतिनिधीः** शेअर मार्केटमधील गुंतवणुकीच्या बहाण्याने तब्बल 1 कोटी 78 लाख रुपयांची फसवणूक केल्याप्रकरणी एका आरोपीस मध्य सायबर सेल पोलिसांनी अटक केली. अजय रमेश मौर्या असे या आरोपीचे नाव असून तो ठाण्याचा रहिवाशी आहे. त्याच्याकडून पोलिसांनी एका मोबाइलसह सुमारे दीड लाखांची कॅश गोठविली आहे. सायबर ठगांना बँक खाती पुरविल्याचा त्याच्यावर आरोप असून याच गुन्ह्यात तो सध्या पोलीस कोठडीत आहे. मिळालेल्या माहितीनुसार, फसवणूक झालेल्या तक्रारदारांना एका अज्ञात व्यक्तीने मे ते जून 2025 या कालावधीत शेअरसंदभार्तील एक लिंक पाठवून त्यांना शेअरमार्केटमध्ये गुंतवणुकीचा सल्ला दिला होता. या गुंतवणुकीवर तक्रारदारांना चांगल्या परताव्याचे आमिष दाखविण्यात आले होते. त्यामुळे त्यांनी विविध शेअरमध्ये 1 कोटी 78 लाखांची गुंतवणूक केली होती.

मात्र या गुंतवणुकीवर मूळ रक्कमेसह परताव्याची रक्कम न देता त्यांची फसवणूक झाली होती. याप्रकरणी मध्य सायबर सेल पोलिसात फसवणुकीसह आयटी कलमांतर्गत गुन्हा दाखल करण्यात आला होता. गुन्हा दाखल होताच वरिष्ठ पोलीस निरीक्षक सुधाकर हुंबे, पोलीस उपनिरीक्षक अमोल कांबळे, पोलीस हवालदार नाडगौडा, किरण वसईकर यांनी तपास सुरू केला होता. हा तपास सुरू असताना तांत्रिक माहितीवरून पोलिसांनी अजय मौयार्ला चौकशीसाठी ताब्यात घेतले होते.

# गंगापूर गावात घरातून ५ किलो ८०५ ग्रॅम गांजा जप्त; युवकाला अटक

**■नाशिक । प्रतिनिधीः** गंगापूर गावात एका घरातून गांजा विक्री करणाऱ्या युवकास गंगापूर पोलिसांनी सापळा रचून अटक केली. पोलिसांनी त्याच्या ताब्यातून ५ किलो ८०५ ग्रॅम गांजासदृश्य अंमली पदार्थ, चिलीम व प्लॉस्टिकच्या पिशव्या असा मुद्देमाल जप्त केला आहे. न्यायालयाने त्यास चार दिवसांची पोलीस कोठडी सुनावली. अनिल गुंजाळ (वय ३७, रा. पेठ गल्ली, गंगापूर गाव, नाशिक) असे अटक केलेल्या संशयित आरोपीचे नाव आहे. गंगापूर पोलीस ठाण्या वरिष्ठ पोलीस निरीक्षक जग्वेंद्रसिंग राजपूत यांनी गुन्हे शोध पथकाचे उपनिरीक्षक मोतीलाल पाटील व अंमलदार आणि खंडणी विरोधी पथकातील अंमलदारांना गंगापूर पोलीस ठाणे हद्दीत अंमली





पदार्थ विक्री करणाऱ्यांची माहिती काढून कारवाई करण्याबाबत सूचना दिल्या होत्या. अंमलदार तुळशीदास चौधरी यांना गुरुवारी (दि.३१) पेट्रोलिंग करत असताना संशयित अनिल गुंजाळ हा घरात गांजासदृश्य अंमली पदार्थ विक्री करत असल्याची माहिती मिळाली. त्यानुसार पोलिसांनी सापळा रचून छापा टाकला. पोलिसांना संशयित अनिल गुंजाळ यास अटक केली. त्यांच्यातून घरात तब्बल एक लाख ५५ हजार ५८५ रूपयांचा ५ किलो ८०५ ग्रॅम गांजासदृश्य अंमली पदार्थ, गांजाचे सेवनकरिता वापरण्यात येणाऱ्या चिलीम व गांजा भरून विक्री करण्यासाठी वापरण्यात येणाऱ्या लहान प्लॉस्टिकच्या पिशव्या असा मुद्देमाल जप्त केला. याप्रकरणी गंगापूर पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

# मुंबई लोकल तिकिटांसाठी आता व्हॉट्सऍप!

**■मुंबई । प्रतिनिधीः** मुंबईकरांना लोकल ट्रेनची तिकीटं काढणं आणखी सोपं होणार आहे. रेल्वे आता व्हॉट्सऍपसारख्या चॅट-आधारित ऍपवरून तिकीट बुकिंगची शक्यता पडताळून पाहत आहे. अलीकडेच रेल्वे अधिकाऱ्यांनी या संदर्भात विविध संस्थांशी चर्चा केली आहे आणि सर्व तपशील निश्चित झाल्यावर निविदा प्रक्रिया पूर्ण केली जाईल. 'डिजिटल इंडिया' उपक्रमाचा हा एक भाग आहे, ज्याचा उद्देश जलद आणि कॅशलेस तिकीट सेवा प्रदान करणे आहे. सध्या, सुमारे २५% प्रवासी डिजिटल पद्धतीने तिकीट बुक करतात आणि ही संख्या दररोज वाढत आहे.

# 'माल पाहिजे का?' चॅटवर खेवलकरचा होकार, पोलिसांनी पुराव्यांसह पाचही आरोपींना केलं कोठडीत रवाना

**■पुणे। प्रतिनिधीः** खराडी येथील हॉटेल स्टेबर्डमधील अमली पदार्थ पार्टीच्या आदल्या दिवशी डॉ. प्रांजल खेवलकर याच्याशी दुसऱ्या आरोपीने समाजमाध्यमातून चॅटिंग करताना सिगारेटचा फोटो पाठवून ह्यमाल पाहिजे का, अशी विचारणा केली. त्यावर खेवलकरने ठेवून घ्या असे होकारार्थी उत्तर दिले. अशा प्रकारे पार्टीत अमली पदार्थ आणण्यात आल्याचा दावा पुणे पोलिसांनी गुरुवारी न्यायालयात केला. खेवलकरच्या मोबाइल व लॅपटॉपमध्ये पार्टीमध्ये व पार्टीनंतर केलेल्या गैरकृत्यांच्या अनेक आक्षेपार्ह चित्रफिती व छायाचित्रे आढळून आली असून, त्यातून दखलपात्र बाबी निष्पन्न होण्याची शक्यताही पोलिसांनी व्यक्त केली. या प्रकरणात पाच आरोपींच्या पोलिस कोठडीची मुदत संपल्याने गुरुवारी दुपारी त्यांना न्यायालयात हजर करण्यात आले. आरोपी दोन वर्षांपासून एकमेकांच्या संपर्कात असून, त्यांनी वेगवेगळ्या ठिकाणी पार्टी केली आहे, असे सायबर तज्ज्ञांचा अहवाल व साक्षीदारांच्या तपासातून निष्पन्न झाले आहे. या पार्टीत हुक्का तयार करून देणाऱ्या व्यक्तीबाबत आरोपी उडवाउडवीची उत्तरे देत आहेत, अशी माहिती खंडणी विरोधी पथकाचे वरिष्ठ निरीक्षक विजय कुंभार यांनी न्यायालयाला दिली. न्यायालयाने डॉ. प्रांजल मनीष खेवलकर (वय ४१, रा. इंद्रप्रस्थ सोसायटी, हडपसर) याच्यासह निखिल जेठानंद पोपटाणी (वय ३५, रा. डीएसके



सुंदरबन, माळवाडी रस्ता), समीर फकीरमहंमद सय्यद (वय ४१, रा. पॅलेस ऑर्किड सोसायटी, एनआयबीएम रस्ता), सचिन सोनाजी भोंबे (वय ४२, रा. द्वारकानगर, वाघोली), श्रीपाद मोहन यादव (वय २७, रा. पंचतारानगर, आकुर्डी) या पाच आरोपींना न्यायालयीन कोठडी सुनावली. आरोपी ईशा देवज्योत सिंग (वय २२, रा. कुमार बिर्ला सोसायटी, औंध) आणि प्राची गोपाल शर्मा (वय २३, रा. गोदरेज ग्रीन सोसायटी, म्हाळुंगे) यांची न्यायालयाने मागील तारखेलाच न्यायालयीन कोठडीत रवानगी केली होती. पार्टीच्या ठिकाणी प्लास्टिकच्या पिशवीतील अमली पदार्थ जप्त करण्यात आले असून, तिन्ही पुड्या एकत्र केल्या आहेत, अशी माहिती कुंभार यांनी न्यायालयात दिली. आरोपींचे मोबाइल, कॅमेरा, लॅपटॉप, पेनड्राइव्ह व घटनास्थळावरील सीसीटीव्ही चित्रीकरणाचा डीव्हीआर याबाबत सायबर तज्ज्ञांचा अहवाल पुढील दोन दिवसांत मिळणार आहे; तसेच हुक्का तयार करणाऱ्या आरोपीला ताब्यात घेऊन त्याचा गुन्ह्यातील सहभाग निश्चित करायचा आहे. याबाबत आरोपींकडे चौकशी करायची असून, त्यासाठी आरोपींच्या पोलिस कोठडीत वाढ करावी, अशी मागणी सरकारी वकील योगेश कदम यांनी केली.

आरोपींच्या वतीने ऍड. ऋषिकेश गानू, ऍड. विजयसिंह ठोंबरे, ऍड. पुष्कर दुर्गे, ऍड. सचिन झालटे-पाटील, ऍड. राघव पुराणिक यांनी प्रखर युक्तिवाद केला. पोलिसांनी नमूद केलेल्या माल या शब्दाची व्याख्या एनडीपीएस कायद्यात नाही. पार्टीत एका आरोपी महिलेच्या पर्समध्ये कथित अमली पदार्थ सापडला असून, त्याचे वजन व त्याचा ताबा इतर आरोपींकडे नसल्याने त्यांना हा कायदा लागू होत नाही. मध्यरात्री कारवाई झाल्यानंतर दुपारी 'एफआयआर' दाखल झाला.

# माजी पंतप्रधानांचा नातू बलात्कारात दोषी! पीडितेची साडी ठरली पुरावा

**■बंगळुरु। प्रतिनिधीः** भारताचे माजी पंतप्रधान एच.डी. देवगौडा यांचा नातू आणि जनता दल (सेक्युलर) पक्षाचा माजी खासदार प्रज्वल रेवन्ना याला एका घरकाम करणाऱ्या महिलेशी ...

रेल्वेला आशा आहे की चॅट-आधारित प्रणाली आणखी सोयीस्कर ठरेल. मेट्रो प्रवाशांमध्ये ही प्रणाली आधीच लोकप्रिय आहे, जिथे क्यूआर कोड स्कॅन केल्यावर एक चॅट इंटरफेस उघडतो. 'हाय' मेसेज पाठवल्यानंतर प्रवासी त्यांचे पर्याय निवडू शकतात, पैसे देऊ शकतात आणि डिजिटल तिकीट प्राप्त करू शकतात. मेट्रोमध्ये ६७% तिकीट बुकिंग या पद्धतीने होते. मात्र, अधिकारी सावध आहेत. लोकल ट्रेनसाठी अशीच क्यूआर-आधारित प्रणाली पूर्वी गैरवापरली गेली होती, त्यामुळे नवीन प्रणाली समान समस्या टाळण्यासाठी काळजीपूर्वक विकसित करावी लागेल. पश्चिम रेल्वेचे मुख्य जनसंपर्क अधिकारी, विनीत अभिषेक यांनी सांगितले की, वापरकर्ता-अनुकूल प्रणाली तयार करण्यासाठी ते चॅट-आधारित तिकीट बुकिंगसह अनेक पयार्यांवर विचार करत आहेत.

# नाशिकमध्ये पती-पत्नीच्या नात्याला काळीमा, पत्नीचे अश्लील व्हिडीओ काढले, डान्सबारमध्ये नाचायला भाग पाडलं

**■नाशिक । प्रतिनिधीः** पती-पत्नीच्या नात्यामध्ये समर्पण असतं. एकमेकांच्या सुख-दुःखामध्ये ते सहभागी होतात. आयुष्यभर एकमेकांची साथ देतात. एकमेकांना जपतात, काळजी घेतात. एकमेकांच्या विचारांचा आदर करतात. पण नाशिकमधून एक संतापजनक घटना समोर आली आहे. पतीने आपल्या पत्नीचे अश्लील व्हिडीओ बनवले. तो एवढ्यावरच थांबला नाही तर त्याने ते व्हिडीओ व्हायरल करण्याची धमकी देत पत्नीला डान्सबारमध्ये नाचण्यासाठी भाग पाडलं. संबंधित प्रकार समोर आल्यानंतर नाशिकमध्ये एकच खळबळ उडाली आहे. एक




पती आपल्या पत्नीसोबत इतकं विक्षिप्त, विचित्र, किळसवाणं आणि संतापजनक कसं वागू शकतो? असा प्रश्न या निमित्ताने उपस्थित होतोय. या घटनेतील आरोपी पतीवर कठोरात कठोर शिक्षा व्हावी, जेणेकरुन असं कृत्य करणाऱ्यांना धाक बसेल, अशी मागणी सर्वसामान्यांकडून केली जात आहे.

नेमकं प्रकरण काय?

पती-पत्नीच्या नात्याला काळीमा फासणारा प्रकार नाशिकच्या पंचवटी येथून समोर आला आहे. पत्नीचे अश्लील व्हिडीओ काढून तिला डान्सबारमध्ये नाचायला भाग पाडल्याचा संतापजनक प्रकार समोर आला आहे. पतीने पत्नीला गुंगीचं औषध दिलं. त्यानंतर तिचे अश्लील व्हिडीओ काढले. पती एवढ्यावरच थांबला नाही. तर त्याने ते अश्लील व्हिडीओ व्हायरल करण्याची धमकी देत पत्नीला डान्सबारमध्ये नाचायला भाग पाडलं. त्याने बदनामीचा धाक दाखवल्याने पीडितेला डान्सबारमध्ये नाचावं लागलं. हा संतापजनक प्रकार आता समोर आला आहे. या घटनेतील नराधम पतीने सलग दोन वर्ष आपल्या पत्नीला आधी सोलापूर नंतर बंगळुरुत डान्सबारमध्ये नाचायला भाग पाडलं. पतीचा जाच असहाय्य झाल्यामुळे पीडित महिलेने या विरोधात लढायचा निश्चय केला. पीडितेने नाशिकमधील पंचवटी पोलीस ठाण्यात धाव घेतली. पंचवटी पोलिसांनी या घटनेची गंभीरपणे दखल घेतली. या प्रकरणी पोलिसांनी पीडितेचा पती पवन गाडेकर आणि त्याचा मित्र अक्षय गांगूर्डे यांच्या विरोधात पंचवटी पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल केला आहे. या घटनेवर पंचवटी पोलिसांनी प्रतिक्रिया दिली आहे. पोलिसांना या प्रकरणातील आरोपींना अटक करण्यात अद्याप यश आलेलं नाही. पण पोलीस लवकराच लवकर आरोपींच्या मुसक्या आवळल्याची शक्यता आहे. आरोपी सध्या फरार आहेत. त्यांचं लोकेशन ट्रेस केलं जात आहे. त्यांचा लवकराच लवकर शोध घेतला जाईल', अशी माहिती पंचवटी पोलीस ठाण्याच्या वरिष्ठ पोलीस अधिकाऱ्यांनी दिली आहे.

# एसटी महामंडळ राज्यभर पेट्रोल पंप सुरू करणार





**■मुंबई। प्रतिनिधीः** एसटी महामंडळाची आर्थिक स्थिती सुधारण्यासाठी आणि उत्पन्नाचे नवीन स्त्रोत निर्माण करण्यासाठी राज्यभरात व्यावसायिक तत्त्वावर पेट्रोल आणि डिझेल विक्री पंप सुरू करण्यात येणार आहेत. ही महत्त्वपूर्ण माहिती परिवहन मंत्री तथा एसटी महामंडळाचे अध्यक्ष प्रताप सरनाईक यांनी दिली. हा प्रकल्प केंद्र आणि राज्य सरकारच्या संयुक्त व्यावसायिक भागीदारीतून कार्यान्वित केला जाणार आहे. याविषयी माहिती देताना मंत्री प्रताप सरनाईक म्हणाले की, एसटी महामंडळाची आर्थिक स्थिती सध्या अत्यंत नाजूक आहे. केवळ प्रवासी तिकिटांवर अवलंबून न राहता उत्पन्नाचे पयार्यी स्त्रोत निर्माण करणे गरजेचे आहे. त्याच धोरणाचा भाग म्हणून हा निर्णय घेण्यात आला आहे. महामंडळ गेल्या ७० वर्षांपासून इंडियन ऑइल, भारत पेट्रोलियम यांसारख्या कंपन्यांकडून आपल्या बसेससाठी डिझेल खरेदी करते. सध्या महामंडळाकडे स्वतःच्या मालकीचे २५१ इंधन वितरण पंप आहेत, जे केवळ एसटी बसेससाठी वापरले जातात. त्यामुळे पेट्रोल पंप चालवण्याचा आणि व्यवस्थापनाचा पुरेसा अनुभव महामंडळाकडे आधीपासूनच आहे. याच अनुभवाचा फायदा घेत, आता हे पंप सर्वसामान्य ग्राहकांसाठी खुले करण्यात येणार आहेत. इंडियन ऑइल, भारत पेट्रोलियम आणि हिंदुस्तान पेट्रोलियम या केंद्र सरकारी कंपन्यांशी व्यावसायिक करार करून ही योजना राबवण्यात येणार आहे. या पंपांवर इंधन विक्रीबरोबरच किरकोळ विक्रीसाठी रिटेल शॉपही उभारले जातील. यामुळे फक्त महामंडळाचे उत्पन्न वाढणार नाही, तर इतर संबंधित व्यवसायांनाही चालना मिळेल.

हे दैनिक मालक, मुद्रक, प्रकाशक व संपादक - डॉ. श्री. दिपक मोरेश्वर नाईक यांनी सोमाणी प्रिंटींग प्रेस, कार्यालय - गाला नं. ४, एन. के. इंडस्ट्रीयल इस्टेट, प्रवासी इंडस्ट्रीयल इस्टेटच्या बाजुला, गेट नं. २, गोरेगाव (पुर्व) मुंबई ४०००६३ (महाराष्ट्र) , येथे छापून रुम नं. १०३, कुणाल कुटीर बी बिल्डींग, नवघर रोड, हनुमान मदिराजवळ, भाईंदर (पुर्व), जि. ठाणे ४०११०५ (महाराष्ट्र) येथे प्रसिद्ध केले. संपादक - डॉ. श्री. दिपक मोरेश्वर नाईक, पीआरबी कायद्यानुसार संपादकीय जवाबदारी यांची राहील, सर्व वाद आणि दावे ठाणे न्यायालयीन कक्षेच्या आधील राहतील. (या वर्तमानपत्रात प्रसिद्ध होणाऱ्या बातम्या /लेख / जाहिराती यांची जवाबदारी संबधीत वार्ताहर, लेखक, आणि जाहिरात प्रतिनिधी याच्यावर राहील.) भ्रमणध्वनी - ७४००००१४७४. Email : marathiekikaran2021 @gmail.com

Printed , Published and Owned by **Dr. Mr. Deepak Moreshwar Naik**. Printed at **SOMANI PRINTING PRESS**, OFFICE - Gala No. 4, Near N.K. Industrial Estate, Near Pravasi IndustrialEstate, Gate No.2, Goregaon (E), Mumbai 400 063, Maharashtra, Published at Room No. 103, Kunal Kutir, B Building , Navghar Road, Near Hanuman Mandir, Bhayander (East ) Dist - Thane, PinCode 401 105, Maharashtra. Editor : Dr. Mr. Deepak Moreshwar Naik, Mo.7400001474, Email Id : marathiekikaran2021@gmail.com